# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ११/०२/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ११/०२/२००५ रोजी सभा सुचना क्र. २४, दि. ०७/०२/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ६) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ७) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ८) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ९) | श्री. मिलन गो. पाटील | सदस्य |
| १०) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ११) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| २) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

### रजेचा अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सदस्या, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४० चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

दि. ०१/११/२००४ रोजीच्या इतिवृत्तांत पान नं. १ वर आम्हांला सदस्यांना तर आम्हांस सदस्यांना असे करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पान क्र. ४ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसने पाठींबा दिला, ठराव मंजुर झाले. उत्तनचे नागरिक कॉंग्रेसचे ऋणी आहेत ही जी वाक्ये आहेत तसेच शेवटचे सांगितले की, राष्ट्रवादी कॉंग्रेसने ठरवले हे असे इतिवृत्तांत तीन-चार वेळा झाले. तरी ह्याच्यामध्ये दुरुस्ती सुचवली आहे ती येतच नाही.

**मा. सभापती :-**

ही दुरुस्ती सुधारित केली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्याच्यात दुरुस्ती केली म्हणून मला ते पान देण्यांत आलेले आहे ते आपण सगळ्यांना वाटा म्हणजे हे परत परत नको.

**प्र. सचिव :-**

ठिक आहे. दुरुस्ती करुन पान सगळ्यांना वाटण्यांत येईल.

**रिटा शाह :-**

पान क्र. ६ वर त्याचा उल्लेख कुठे आहे? तसे कॅसेट काढा आणि अनुमोदन झाले की नाही? दोन झाले की तीन झाले ते बघा. ते मी विचारत नाही असे बोलले नाही. सर्वांचे सर्वानुमते अनुमोदन झाले होते. पण ते अनुमोदन मी केले आहे. पण ते दोनदा आले आहे ते कट करा. कांबळे साहेब ही दुःखाची गोष्ट आहे. ते बरोबर आहे. नंतर त्यांना असे वाटले की, हे जे शब्द आहेत हे वाक्य आहे ते मी बोलले नाही. आपण ते कट करा. नंतर ते सही घ्यावी पर्यंत कट करा. त्यानंतर त्यावर चर्चा सुरु झाली असे लिहिले आहे. पण ॲक्चुअली ठरावाला सुरुवात झाली. सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी ठराव केला होता. त्यानंतर त्याच्यावर चर्चा सुरु झाली. त्यानंतर सभापती साहेबांनी सांगितले की, आपल्याला हे करुन घ्यायचे आहे. महत्वाचे काम आहे. ठराव मांडला आणि त्यांनी ठराव मांडल्यानंतर मी लगेच अनुमोदन केले. त्यानंतर मी असे बोलले नाही की, मी नाही ना बोलत की मी अनुमोदन केले नाही. मी अनुमोदन केल्यानंतर असे बोलण्याचा प्रश्नच येत नाही. ते कट करा. ते तसे पान क्र. १५ वर आलेले आहे. रिटा शाह ह्यांनी अनुमोदन केलेले आहे. मी भेटली नाही यामुळे माझी सही मिळाली नाही व त्यांनी दुसऱ्याची सही घेतली. त्यानंतर असे काही झाले नाही हे कट करा. मला काही कामाचा विरोध नाही. जे तुमच्या कायदेशीर असेल ते तुम्ही मला प्रोसिडींगमध्ये दाखवून द्या आणि तुम्ही टेप वाजवा आणि बघा की, अनुमोदन प्रेमनाथ पाटील साहेब ह्यांचे आहे किंवा नाही हा एक नगरसेवकाच्या हक्काचा प्रश्न आहे. पान क्र. ७ वर रिटा शाह, सचिव साहेब मी मान्य करते की, माझे नांव काढा. जेव्हा मी माझे नांव टाका बोलते तर नांव काढण्याचा प्रश्नच येत नाही. ही वाक्यरचना संपूर्ण खोटी आहे. फक्त पासून चालू करा. फक्त मला प्रोसिडींगमध्ये दाखवा की, प्रेमनाथ पाटील असे बोलले की तेव्हापासून स्टार्ट होते. पुढचे पहिले वाक्य त्याच्यामधून कट करा. मग शेवटला रिटा शाह तुम्ही रुलिंग दिली आहे की, टेप वाजवा. हे मलाही मान्य आहे असे मी बोलले नाही ते कट करा आहे की शेवटी उत्तर तसेच भेटणार आहे ते बरोबर आहे. परत शेवटी माझे वाक्य, साहेब आपण सभापती आहात आणि आपण जर म्हणत असाल की, टेपमध्ये आले असेल, पण ते टेपमध्ये आहे म्हणून पंधराव्या पानावर आले आहे. असे नाही, माझे अनुमोदन देत आहे तशी नोंद आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, पान क्र. ९ वर औषधांची फवारणी बरोबर होत नाही आहे असे लिहिलेले आहे. तर आहे हा शब्द काढून टाका.

**मा. सभापती :-**

पान क्र. १५ मध्ये नागेश इरकर एम.एस.सी. ॲग्री अशी दुरुस्ती करावी.

**सुर्यकांत भोईर :-**

पान क्र. २३ मध्ये वनखात्याच्या अधिकाऱ्यांना काही माहित नाही आहे तर आहे हा शब्द काढावा. पान क्र. ३७ मध्ये तुम्ही ठेकेदार आणा तर तिथे अधिकारी हा शब्द पाहिजे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, माझी एक विनंती आहे. मागचा तुम्ही सुधारित ठराव ह्याच्यामध्ये दिला नाही आणि आज आपण फक्त दोन प्रोसिडींग आपण पास करुन घेतो. पुढच्या दोन प्रोसिडींग आपण पुढच्या सभेत घ्यावे. कारण आम्हांला ते वाचायला टाईम मिळाले नाही.

**मा. सभापती :-**

ठिक आहे.

**मिलन पाटील :-**

दि. ०८/११/२००४ रोजीच्या इतिवृत्तांत पान क्र. ११ वर तुम्ही कुठल्या ह्याच्यावर पैसे फिरवले तर कुठल्या हेडवर पैसे फिरवले अशी दुरुस्ती करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पान क्र. १२ मध्ये त्याच्यासाठी कुठले मार्केट बांधणार? तर ह्याच्यातून कुठले मार्केट बांधणार आणि दिड कोटी ५० लाख आहेत आणि चार बाजारपेठा व कत्तलखाने आहेत त्याच्यासाठी लिहिले आहे. तिथे त्याच्यातून असे पाहिजे.

**प्र. सचिव :-**

हे जे दोन उर्वरित इतिवृत्तांत आहे ते पुढच्या सभेत मंजुर करण्यासाठी मा. सभापती साहेबांनी सुचित केल्यामुळे दि. ०७/१२/२००४ व दि. १४/१२/२००४ चे इतिवृत्तांत पुढच्या सभेत घेण्यांत येईल.

**रिटा शाह :-**

ज्या दोन इतिवृत्तांताच्या प्रती दिल्या आहेत त्यात सुचनांसह व सुधारित प्रोसिडींग मंजुर करावी असा मी ठराव मांडत आहे.

**केशव घरत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १४० :-**

दि. ०१/११/२००४, दि. ०८/११/२००४, दि. ०७/१२/२००४, दि. १४/१२/२००४ व दि. १४/१२/२००४ (तहकुब) रोजीच्या मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १५३ :-**

वरीलप्रमाणे मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह दि. ०१/११/२००४, दि. ०८/११/२००४ रोजीच्या मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणेंत येत आहे व दि. ०७/१२/२००४, दि. १४/१२/२००४ व दि. १४/१२/२००४ (तहकुब) रोजीच्या मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत मंजुरीकरीता पुढील सभेत घेणेंत यावेत.

**सुचक :- सौ. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. सभापती**

**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४१ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

सदर विषयाचा गोषवारा नाही.

**रिटा शाह :-**

महापौर चषक केव्हापासून चालू होणार?

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये महानगरपालिका स्थापन झाल्यापासून आपण विविध क्षेत्रातील कला क्रिडा या माध्यमातून गुणांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने आपण हा तृतीय वर्षी महापौर चषक भरवावा असा विषय येथे आणला आहे आणि मागच्या एका सभेमध्ये आपली ह्या विषयावर चर्चाही झाली. चर्चेमध्ये आपण असा विचार केला की, जर सन्मा. महापौरांचा कार्यकाल हा अडीच वर्षाचा असतो आणि त्यांच्या अडीच वर्षाच्या कार्यकालानंतर नविन महापौर येणार आहेत. त्याकरिता आपण ह्या मा. महापौरांनी जे आपल्याला प्रशासनाच्या बाबतीमध्ये अधिका-यांना आणि सर्व सन्मा. सदस्यांना एकत्रित करुन त्यांचे जे प्रश्न होते ते तडीस नेण्यासाठी त्यांनी हसत खेळत आपणां सर्वांना एकत्र ठेवून असे अनेक प्रश्न त्यांनी तडीस घेऊन गेले आणि मिरा भाईंदरच्या त्यांच्या ह्या कार्यकालामध्ये असे मा. महापौरांच्या वतीने कोणतेही काम राहिले असा विषय नाही. जवळपास प्रत्येक सदस्यांना ते वाटते. जे जे सन्मा. सदस्य कोणत्याही पक्षाच्या माध्यमातून किंवा कोणत्या संघटनेच्या माध्यमातून, कोणत्या अधिका-याच्या माध्यमातून त्यांच्याकडे गेल्यानंतर त्यांनी हसत खेळत हा प्रश्न सोडविलेला आहे. ह्या विषयी चर्चा व्हावी आणि ह्या चर्चेला आपल्या सर्व सन्मा. सदस्यांनी चांगला प्रतिसादही दिला हे आपल्याला ज्ञात आहे आणि त्यानंतर आपण आज हा चषक त्यांच्या कालावधीमध्ये करावा अशा पद्धतीची धारणा प्रत्येक सदस्याची त्यावेळी झाली होती. म्हणून अंदाजपत्रकाची सभा असल्या कारणाने कमिशनर साहेब बिहार-पटना येथे निवडणुकीच्या कार्यक्रमाला गेल्यानंतर त्यांनी ते बजेट आपल्याकडे

ठेवले. कारण जर ते गेले तर एक महिना उशिर होईल आणि त्यापुर्वी आपल्याला तो विषय घेणे क्रमप्राप्त होता. म्हणून महापौर चषक हा विषय आपण चर्चेला आणला होता. तरीसुद्धा आपण तो विषय विषयपटलावर घेऊ शकलो नाही आणि बजेटची सभा मागच्या आठवड्यात झालेली आहे आणि मा. महासभेला आपण त्याची शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने आज हा महापौर चषकाचा विषय आणला आहे. मला मागच्या सभेमध्ये आपण ज्या पद्धतीने प्रतिसाद दिला त्या पद्धतीने ह्यावेळीसुद्धा आपण प्रतिसाद द्याल अशी अपेक्षा करतो. कारण आपल्या म्हणण्यानुसारच आपण हा विषय या ठिकाणी घेतला होता आणि आजही विषय आपण घेत आहोत. तर ह्या विषयामध्ये ज्या आपल्या सुचना असतील व कोणत्या पद्धतीने हा चषक भरवला पाहिजे. कारण त्यावेळी मागच्या चषकाच्या वेळी आपण त्याचा उल्लेख करुन त्याचा आढावा घेतला होता की, ज्या पद्धीने या शहरामध्ये संपुर्ण शाळांना, संपुर्ण संघटनांना, सार्वजनिक संस्थेला एकत्र करुन ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये हा चषक असल्याचे चांगले वातावरण निर्मिती झाली पाहिजे अशा पद्धतीची आपण चर्चा केली होती आणि आज अधिकृतरित्या हा विषय येथे आलेला आहे. कृपया आपल्या या चषकाबद्दल ज्या भावना असतील की, हे कोणत्या पद्धतीने आपण भरवले पाहिजे? कोणकोणत्या खेळांना आपण प्राधान्य दिले पाहिजे? अशा पद्धतीच्या आपल्या ज्या काही सुचना असतील त्या सुचना आपण या ठिकाणी मांडाव्यात आणि हा चषक चांगल्या पद्धतीने भरविण्यासाठी आपल्या अमुल्य सुचना या ठिकाणी द्याल आणि हा विषय चांगल्या पद्धतीने करु शकू असा एक विश्वास आपण या मिरा भाईंदरमधील संपूर्ण कला-क्रिडा प्रेमी असू द्या, शिक्षण प्रेमी असू द्या किंवा अनेक असे सार्वजनिक क्षेत्रातील लोक असू द्या त्यांना महपौर चषकातून चांगल्या प्रकारच्या सुचना द्याव्यात अशी मी विनंती करतो आणि अपील करतो. धन्यवाद!

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, महापौर निवडणुक दि. २८ फेब्रुवारी २००५ रोजी आहे. त्याच्या अगोदर जर आपण महापौर चषक घेतले तर चांगले होईल. आत्ताच्या मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली महापौर चषक झाले त्याच्या अंतर्गत मिरा भाईंदर शालेय क्रिडा स्पर्धा झाल्या पाहिजेत. म्हणून आपल्या शहरातील संपूर्ण शाळांना त्याचा लाभ उठविता येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, जसे कला-क्रिडा महोत्सव भरविण्यांत येते त्याच्यात मिरा भाईंदर शहरातील सर्व शाळांचा समावेश असतो. त्या पद्धतीने आपण ही महापौर चषक स्पर्धेत सर्वांना समाविष्ट करावे अशी माझी विनंती आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, मिरा भाईंदर शहरा अंतर्गत आपल्या ज्या महापालिकेच्या शाळा आहेत, प्राथमिक व माध्यमिक, त्यांनाही महापौर चषकात सामील करुन घ्या आणि आता परिक्षाही झालेल्या आहेत. तर २१ ते २६ तारखेच्या आत महापौर चषक भरविले तर अतिउत्तम होईल. म्हणजे मा. महापौरांचा कार्यकाल पुर्ण होण्याच्या अगोदर त्यांच्या अध्यक्षतेखाली महापौर चषक भरविले तर अतिउत्तम होईल अशी मी सुचना मांडतो.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, जेव्हा सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील हे नगराध्यक्ष होते त्यावेळी प्रायव्हेट शाळेच्या मुलांनाही अंतर्भूत केले होते. तर मला असे वाटते की, त्यांनाही आपण ह्याच्यामध्ये घ्यावे. त्याचप्रमाणे २५ ते ४० वर्षापर्यंतच्या महिलांसाठी आपण काहीतरी प्रयोजन करावे. कारण त्याही त्याच्यामध्ये उत्साहात भाग घेणार.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने बोलतो. सर्व सन्मा. सदस्यांनी जी सुचना मांडलेली आहे ती अतियोग्य आहे आणि आमचासुद्धा त्याला पाठिंबा आहे आणि गावामध्ये व शहरामध्ये नविन पायंडा पाडला जाईल आणि आपल्याच मुलांना चांगली संधी मिळेल आणि हा जो आपण चषक भरविणार आहोत त्यात सर्वांना समाविष्ट करावे अशी मीसुद्धा सुचना मांडतो.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, ज्या सुचना सदस्यांनी मांडल्या त्या खरोखर विचार करण्यासारख्या आहेत आणि दुसरी बाब अशी की, जे सर्व सामने आहेत ते सुभाषचंद्र मैदानामध्ये भरवतो आणि उद्या आपण शाळे अंतर्गत ज्या मॅचेस, सामने भरवू ते बघण्यासाठी पब्लिक नसतात. तर माझी अशी सुचना आहे की, जसे नवघर शाळेचे ग्राऊंण्ड आहे. मागच्या वेळेस तिथे आपण कुस्तीचा सामना ठेवला होता. त्या कुस्तीला भरपूर पब्लिक होते. त्यामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळते. शक्यतो ज्या काही मॅचेस आहेत,

काही स्पर्धा आहेत त्या येथे ठेवाव्यात आणि छोट्या ग्राऊण्डमध्ये होणाऱ्या स्पर्धा त्या नवघर गावात ठेवाव्या अशी मी सुचना मांडतो.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, माझी अशी एक सुचना आहे. जर महापौर चषक भरवत असाल तर महापालिकेच्या इमारतीखाली मा. महापौरांचा फोटो व महापालिकेचे सिम्बॉल अशी रांगोळी काढावी. म्हणजे तिथल्या लोकांना दिसेल की, महापौर चषक आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सभापती साहेबांच्या संमतीने बोलतो की, गेल्या वर्षी आपण महापौर चषकासाठी पंधरा लाखाचे बजेट ठेवले होते व ते पंधरा लाख रुपये संपवले आणि ह्यावेळी आपण आता चाळीस लाखाचे बजेट ठेवले आहे. ते फार मोठे बजेट आहे. ह्यासाठी मला वाटते पंधरा लाखापर्यंत बजेट ठेवावे आणि हा कार्यक्रम करण्यासाठी दिवस फार कमी आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सामने होणार नाहीत. जर मा. महापौरांच्या कार्यकालात करायचे असेल तर आपल्या मिरा भाईंदरमध्ये करुन दहा लाखाच्या बजेटमध्ये पास करावे अशी मी विनंती करतो.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्सजी ह्यांनी जी सुचना मांडली तर आपण बजेटमध्ये अंदाजपत्रकामध्ये ४० लाखाची तरतुद केली आहे. ह्या तरतुदीमध्ये पंधरा लाखात हे खेळ भरविले पाहिजे, दहा लाखात खेळ भरविले पाहिजे किंवा अन्य ३९ लाखात खेळ भरविले पाहिजेत हे त्या खेळावर डिपेंन्ड आहे आणि जर आपली ही रक्कम शिल्लक राहिली तर आपण त्याला रिॲप्रेशिएटमध्ये काढू शकतो. म्हणजे आपण तेवढ्यापर्यंत मर्यादा ठेवलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

महापौर चषकासाठी गेल्या वर्षी किती खर्च झाला होता?

**दिपक खांबित :-**

अठरा लाख चाळीस हजार रुपये.

**मा. सभापती :-**

अठरा लाख चाळीस हजार रुपये एवढा जवळपास खर्च झाला. दुसरा विषय असा आहे की, समजा आपण महापौर चषक अरेंज केला तर महापौर चषकाला आपण एवढे पैसे ठेवल्यानंतर हे जे आपले पैसे आहेत, जी आपण तरतुद केलेली आहे ती कला-क्रिडा ह्याच्यात येते. म्हणजे जर आपण हा महापौर चषक अरेंज केल्यानंतर एखादी मॅरेथॉन स्पर्धा आपण आयोजित केली. नंतर कधी ह्या वर्षाच्या कालावधीमध्ये केले तर आपण ते करु शकतो आणि सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्सजी ही तरतुद आपली मार्चपर्यंत आहे. महापौर चषकाची रक्कम आणि कला-क्रिडा ह्या दोन्हीमध्ये तफावत आहे. महापौर चषक जर आपण कमी रक्कमेमध्ये धरलात तरी ते होऊ शकते आणि हीच जर रक्कम आपण आणखीन कुठले खेळ भरवले तर आपण तशी तरतुद करु शकतो. तरतुद असलेला पैसा आपण किती खर्च करावा? कोणता करावा? हे आपण ठरवायचे. ही जी तरतुद ठेवली आहे ती ह्याच्याकरिता ठेवली आहे की, कुठे आपल्याला अभाव येता कामा नये. म्हणून आपण ही तरतुद ठेवली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

असे बोलण्याचा अर्थ असा आहे की, आपण महापौर चषकासाठी किती तरतुद खर्च करणार ते घोषित करा.

**सुर्यकांत भोईर :-**

गेल्यावर्षी महापौर चषकासाठी जो खर्च झाला असेल त्याच्यापैकी पाच लाख रुपये वाढीव करा. गेल्या वर्षी जो साडे अठरा लाख रुपये झाला आहे तर ह्यावर्षी पंचवीस लाख रुपये करा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर आपण मिरा भाईंदरच्या अंदाजपत्रकाच्या स्थायी समितीमध्ये आपण होते आणि त्यावेळी आपण जी तरतुद केली.

**सुर्यकांत भोईर :-**

खर्चाबद्दल मी बोलतोय. महापौर चषकासाठी निधी आपण चाळीस लाख रुपयाचा ठरवला आहे. तर ज्या मॅरेथॉन स्पर्धा ठेवायच्या आहेत त्या त्याच्यातून ठेवा. माझ्या बोलण्याचा तो अर्थ आहे.

**मा. सभापती :-**

या विषयी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण आज ठरवल्यानंतर आपले सन्मा. सदस्य, कमिटी वगैरे प्रकरण आपणच करायचे आहे. आपण सर्वांनी एकत्र बसून आपल्याला हे सर्व करायचे आहे आणि महापौर चषकासाठी जर आपली तारीख फिक्स होते आणि ती तारीख फिक्स झाल्यानंतर ज्याला ज्या गोष्टी लागणार आहेत त्याच्या निविदा आपण लगेच काढून टाकायच्या. त्याला वेळ लावायचा नाही. म्हणजे ती प्रोसेस एका बाजूला सुरु होईल. एका बाजूने कोणते खेळ करायचे ते सर्व ठरवून घ्यायचे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, मी जो रांगोळीचा प्रस्ताव मांडलेला आहे मा. महापौर मॅडमचा फोटो त्यांच्या हातात तिरंगा झेंडा आणि आपल्या महापालिकेचे सिम्बॉल हे रांगोळीमध्ये आले पाहिजे. जेणेकरुन महानगरपालिकेत येणाऱ्या नागरिकांना दिसेल की, महापौर चषक आहे आणि तिथे एक तारीख द्या की, ही तारीख आहे.

**मा. सभापती :-**

आपला प्रस्ताव चांगला आहे आणि मी सन्मा. सदस्यांना अपील करतो की, आपण ह्या महापौर चषकामध्ये रांगोळी स्पर्धेचे आयोजन करु शकतो. तर आपण रांगोळी स्पर्धेचे आयोजन करु आणि आपण जे बोलता त्याला प्राधान्य देऊ.

**गजानन भोईर :-**

रांगोळी स्पर्धा आयोजित करतांना कमीत कमी नाके-नाके जसे मी शाळेचे सांगितले. रांगोळी स्पर्धा बघण्यासाठी जसे सुभाषचंद्र मैदानामध्ये कोणी येणार नाही. जसे खारी नाका, बंदरवाडी नाका, गोडदेव नाका, पश्चिमेला आहे जेणेकरुन लोक येतील. आपण पुर्वेला करा, पश्चिमेला करा, मिरा रोडला करा, जेणेकरुन लोक येतील.

**मा. सभापती :-**

आपली सुचना रास्त आहे. आपली सुचना बरोबर आहे. पण त्यांनी जे सांगितले, महापौर चषक आपण ज्या ठिकाणी मुख्य मैदानात करु त्या ठिकाणी त्या पद्धतीची रांगोळी काढू आणि अनेक ठिकाणी त्या स्पर्धेचे आयोजन करु. त्या स्पर्धेमध्ये सर्व लोकांना लाभ घेता येईल.

**गजानन भोईर :-**

जी रांगोळी प्रदर्शनी करु ते दुसऱ्या ठिकाणी करा.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती महोदय, आजच्या स्थायी समितीच्या विषयपटलावर जो महापौर चषकाचा विषय आहे. सर्व सन्मा. सदस्यांनी आपआपली मते या सभेपुढे प्रकट केलेली आहेत. ज्या काही त्रुटी सभापती महोदय मागच्या महापौर चषकाच्या दरम्यान राहून गेल्या. सगळ्यात सांगायचा मुद्दा असा की, ह्या महापौर चषकाच्या बाबतीमध्ये जी जाहिरात व्हायला पाहिजे ती होत नाही. कृपया आपण अधिकाऱ्यांना त्या संबंधामध्ये योग्य त्या सुचना द्याव्यात आणि जे जे खेळ मागच्या दोन महापौर चषकाच्या दरम्यान अंतर्भुत झाले नसतील अशा ज्या ज्या सुचना सन्मा. सदस्यांच्या असतील त्या आपण स्विकाराव्यात. राहिला प्रश्न अंदाजपत्रकामध्ये आपण जी तरतुद महापौर चषकासाठी केलेली आहे. ह्या महापौर चषकाचे आयोजन निटनेटके व्हावे आणि यशस्वीरित्या हा कार्यक्रम आपण भरवावा या अनुषंगाने स्थायी सदस्यांमधून आपण एक कमिटी गठन करा आणि त्या कमिटीच्या अंतर्गत बाकीचे जे काही कार्यक्रम असतील ते पुर्वापार करा. तारखेच्या संदर्भामध्ये मी सभापती साहेबांना विनंती करु इच्छितो की, ह्या महिन्याच्या २८ तारखेपर्यंत महापौरांचा कालावधी अस्तित्वात आहे. आपण १९, २० आणि २१ अशा जर तारखा निश्चित केल्या तर मला वाटते हा वेळ फार कमी असेल. कारण आजची तारीख आणि राहिलेला सात दिवसांचा कालावधी त्याच्यामध्ये आयोजन निटनेटके होऊ शकत नाही. तर मी सभेला अशी विनंती करतो की, २५, २६ आणि २७ फेब्रुवारी ह्या ज्या तीन तारखा आहेत, ह्या तीन तारखेत आपण महापौर चषक निश्चित करु की, जेणकरुन आपल्याला त्याचे आयोजन चांगल्या प्रकारे निटनेटके करता येईल. योग्य असा वेळ आपल्या हातात असेल तर ह्या बाबतीमध्ये कृपया सर्व सन्मा. सदस्यांनी विचार करावा. कारण १९, २० आणि २१ ह्या दिवसांमध्ये अवधी फार कमी आहे. तर २५, २६ आणि २७ फेब्रुवारी ही तारीख जर आपण सभापती महोदय निश्चित केली व ह्या तीन दिवसांत जर आपण कार्यक्रमाची आखणी केली तर २५, २६ आणि २७ अशा तीन दिवसांचा कार्यक्रम आपण करु.

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय, गेल्या वेळेला जे महापौर चषक आयोजीत केले होते त्यावेळेला बऱ्याचश्या बाहेरच्या लोकांना बोलावून तो कार्यक्रम आयोजीत केला होता. जर ह्या अवधीमध्ये येणारे कोणी

खेळाडू असतील त्यांनासुध्दा निमंत्रित करायला हरकत नाही. जर त्या अवधीमध्ये आले तर आणि अवधी सोडून आले तर आपण त्याचा निर्णय घेऊ शकता.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, महापौर चषक भरवताना जसे माजी सभापती सन्मा. मॉरस रॉड्रीक्स बोलले की, एवढा खर्च करा, तेवढा खर्च करा. ते न बघता, तुम्ही खर्चाची लिमिट न बघता चांगल्यात चांगला महापौर चषक झाला पाहिजे त्या हिशोबाने आपण पेपर जाहीरात, नाक्या-नाक्यावर महापौर चषकाच्या आयोजनाची प्रसिद्धी झाली पाहिजे.

**केशव घरत :-**

प्रसिद्धी माध्यमातून प्रसिद्धी व्हायला पाहिजे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

प्रासिद्धी झाली तर तो एक महिनाही संपणार नाही आणि आपल्याला तो कार्यक्रम तीन दिवसांत संपवायचा आहे. प्रसिद्धी द्याल तर किती गेम संपणार?

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स साहेब जर प्रसिद्धी केली नाही तर महापौर चषक आयोजनाची लोकांपर्यंत कशी जाईल?

**सुर्यकांत भोईर :-**

तीन दिवसांचा कार्यक्रम आहे. त्याची प्रसिद्धी द्यायला पाहिजे ना.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

जेवढे गेम खेळायचे आहेत तेवढे तीन दिवसांत पूर्ण झाले पाहिजे. प्रसिद्धी दिली तर त्याला तेवढा वेळा कुठे आहे?

**गजानन भोईर :-**

आपण बाहेरच्या टिम मागवणार का नाही मागवणार की, अंतर्गत मिरा भाईंदरमध्येच खेळ भरवणार ह्याच्यावर आपण आधी चर्चा करा.

**हॅरल बोर्जीस :-**

मागच्या महापौर चषकाच्या दरम्यानमध्ये शुटींग बॉल आणि कुस्ती ह्या स्पर्धेला आपल्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता आणि मिरा भाईंदर क्षेत्राचे महापौर चषकाचे नांव हे संपूर्ण महाराष्ट्रभर गाजलेले होते. तर मागच्या वर्षीचा अनुभव लक्षात घेता ह्या वर्षाच्या महापौर चषकामध्ये सदर खेळ अंतर्भुत असतील असे मी गृहित धरुन चाललो आहे. कारण एक प्रकारे शहराचा तो कुठेतरी बहुमान होता. महाराष्ट्र स्तरावरील खेळाडू आपल्याकडे आले आणि आपल्या मैदानाबद्दल आपल्या व्यवस्थेबद्दल त्यांनी अतिशय आनंद प्रकट केलेला होता. तरी ह्या खेळांच्या अंतर्भुत इतर खेळ सुचविले असतील. विशेषतः रांगोळीच्या ज्या स्पर्धा आहेत त्या खेळालाही प्राधान्य द्यावे आणि दुसरे जे काही गेम्स् असतील त्यालासुद्धा आपण अंतर्भूत करावे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, महिलांसाठी आपण वेस्टमधून बेस्ट अशी स्पर्धा ठेवा की, त्यांनी ते घरुनच बनवून आणायचे आणि प्रदर्शनीमध्ये ठेवायचे. तसेच स्वयंपाकाबाबत मराठी, गुजराथी असू दे त्यांनी ते खाद्यपदार्थांची डिश घरुनच बनवून आणायची. त्याच्यावर आपला तिथे जज्ज राहणार. पहिले वेस्टमधून बेस्ट घ्यावे. जसे जे वेस्ट मटेरियल आपल्या घरात असते त्याच्यामधून महिलांची जी कला आहे व ते जाणतात त्यांच्याकडे जाणीव असेल असे. दुसरे मराठी, हिंदी, गुजराथी, पंजाबी अशा डिशेस त्यांनी घरुन बनवुन आणायच्या आणि त्यांच्यावर आपले दोन तीन जज्ज असतील आणि त्यात त्यानी प्रथम, द्वितीय व तृतीय असे पारितोषिक द्यायचे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

पहिले, दुसरे आणि तीसरे पारितोषिक कसे द्यायचे? जर हिंदूमध्ये बेस्ट हिंदुमध्ये होणार, गुजराथीमध्ये बेस्ट गुजराथीमध्ये होणार. सर्वांचे आयटम चांगले असणार.

**रिटा शाह :-**

असे नसते. जेव्हा स्वयंपाकाची स्पर्धा असते त्यात डेकोरेशन वगैरे महत्वाचे असते. आम्ही अशी हजार हजार महिलांची स्पर्धा भरवली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण जे जातीचे बोलता ना!

**रिटा शाह :-**

जातीचे बोलत नाही. डिश कुठले असणार ते सांगते. नॉनव्हेजचे नाही, त्याच्यामध्ये तुम्ही व्हेजचेच ठरवा. नॉनव्हेजमध्ये काय आयटम बनते त्याचे मला नॉलेज नाही. आपण भाजी बनवतो. पण ती भाजी कशी डेकोरेट करायची त्याचे मार्कस् असतात. कारण आम्ही ही स्पर्धा भरवली आहे म्हणून मला माहिती आहे की, त्याच्यामध्ये मार्कस् कसे मिळतात. नॉनव्हेजचे मला माहिती नाही. पण मी जातीचे बोलत नाही की, सर्व जातीच्या लोकांना व्हेजीटेबल आयटम असतात आणि ते वेगवेगळे असतात. त्याच्यामधून त्याचा स्वाद आणि डेकोरेशन हे पण बघायचे असते. त्याची स्पर्धा ठेवा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो. महापौर चषक क्रिडा स्पर्धेच्या अंतर्गत आजच्या ह्या सभेपुढे या संबंधित महापौर चषक क्रिडा विषयी एक समिती गठित करावी. सन्मा. सभापती त्या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतील आणि उर्वरित स्थायी समितीचे जेवढे सभासद आहेत ते सर्व सभासद या समितीत असतील. म्हणजे जे पुढचे महापौर चषकाचे जे आयोजन करायचे आहे ते आपण सगळ्यांनी मिळून त्याबाबतीमध्ये निर्णय घ्यायचा आहे. तर अशी एक समिती आपण गठीत करु व त्यात कोणकोणत्या खेळांना अंतर्भुत करु त्यात आपण मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करु, शुटींग बॉल, कबड्डी, क्रिकेटचे जे सामने असतात ते आपल्याला माहितीच असेल.

**मिलन पाटील :-**

साहेब, क्रिकेटच्या बाबतीत मागच्या वेळेला कोणाला ड्रेस मिळाले, कोणाला नाही. तरी ड्रेस आता कोणाला द्यायला पाहिजे ह्याचा तुम्ही विचार करा.

**हॅरल बोर्जीस :-**

ज्या काही त्रुटी राहून गेल्या असतील त्या पुर्ण करु.

**सुर्यकांत भोईर :-**

गेल्या वर्षी आम्हांला ड्रेस मिळाले नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण ह्या स्पर्धेमध्ये कुस्ती सामन्याला प्राधान्य देत आहोत. इतर जे हेड ठेवले आहेत त्यात सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम बोलल्या, त्यांनी जे जे खेळ सुचविले आहेत, हस्तकौशल्य, रांगोळीच्या बाबतीमध्ये हे सर्व खेळ ह्याच्यामध्ये अंतर्भुत करुन सन २००५ चे महापौर चषक भरविण्यासाठी आजची ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील महापौर चषक भरविण्यासाठी मंजुरी दिली त्याबद्दल धन्यवाद. प्रशासनाच्या बाबतीमध्ये हा महापौर चषक भरवत असतांना उपायुक्त साहेब, महापौर चषक सुरु असतो आणि त्या वेळेला ज्या अधिका-यांवर आपण जबाबदारी देतो ते अधिकारी त्यावेळेला उपस्थित नसतात. त्याकरिता सर्वप्रथम आजच आपण त्या अधिका-यांना एकत्र करुन त्यांना त्यांची जबाबदारी देण्याविषयी मागे चर्चा झाली. सर्व अधिकारी येथे आले होते. ती जबाबदारी देऊन त्यांनी जर ती जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली तर महापौर चषक ह्या तारखेच्या आतमध्ये हा महापौर चषक यशस्वी होऊ शकतो. कारण आपण ब-याचशा जबाबदारी घेतो. परंतु प्रत्यक्ष रित्या त्या मैदानामध्ये ते अधिकारी त्या ठिकाणी अनुपस्थित असतात आणि ते अनुपस्थित असल्या कारणाने आपल्याला त्याचा फटका एवढा बसतो की, ऐन वेळेला जी सुविधांची व्यवस्था व्हायला पाहिजे ती व्यवस्था होत नाही आणि त्याच्यामुळे त्रुटी जाणवतात आणि त्या महापौर चषकाचा परिणाम हा मोठ्या प्रमाणात होतो. त्याकरिता आपण पुन्हा जी सभा मागच्या वेळेला लावली होती ती सभा परत लावून घ्या. त्यांना आपण त्यावेळी जबाबदारी दिलेली आहे आणि त्यांना स्ट्रीक्टली तसे निर्देश लेखी स्वरुपामध्ये देऊन त्यांना त्यांची कामगिरी पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून तुम्ही त्यांना निर्देश देऊन ताबडतोब झाले पाहिजे ते अंमलात आले पाहिजे. कारण काम करणारे काही बांधकाम विभागाचे कर्मचारी असतात, सचिव कार्यालयातील कर्मचारी असतात. बाकी अधिकारी कुठे असतात? त्याचा पत्ता लागत नाही. त्याच्यामुळे ते अधिकारी उपस्थित असतात पण त्यांना जी जबाबदारी दिली आहे त्या जबाबदारीच्या वेळेस ते नसतात. तो विषय होता कामा नये. कारण हे जे महापौर चषक भरवतो हे सन्मा. सदस्यांनी ते भरवावे ह्या पद्धतीने निर्देश दिलेले आहेत. ते अधिका-यांच्या मार्फत झाले पाहिजे अशा पद्धतीने जर काम झाले तरच या कमी अवधीमध्ये २५, २६, २७ ही तारीख फिक्स करतोय.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

पण ह्या दरम्यान इलेक्शनची गडबड असेल.

**मा. सभापती :-**

ह्याच्यात इलेक्शनचा प्रश्न येत नाही. कारण इलेक्शन राखीव अनुसूचित जमातीचा प्रश्न आहे. त्याच्यामुळे हे उमेदवार ठरलेले आहेत. जर हे ओपनमध्ये असते तर आपण त्या स्पर्धेच्या हिशोबाने राजकीय वातावरणात बदल झाला असता. पण तसा बदल होऊ शकत नाही आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या परिसरामध्ये हे कार्यक्रम होणार आहेत आणि ते कुठे बाहेर जाण्याचा संबंध येत नाही की, सन्मा. नगरसेवक बाहेर जातील किंवा बाहेर यावे-जावे लागेल असा विषय नाही. कारण जवळपास अशा निवडणुक असल्या की, सन्मा नगरसेवकांना विशिष्ट पद्धतीने त्याचा विचार करण्यासाठी बाहेर जावे लागते, तसा विषय या ठिकाणी नाही. कारण राखीव उमेदवारी असल्या कारणाने दोन-तीन उमेदवार आपल्या समोरच आहेत आणि त्या उमेदवारांप्रमाणेच होणार आहे. त्यामुळे कुठे बाहेर जाण्याचा प्रश्न येत नाही आणि आपण शहरामध्येच कम्पलसरी राहू असे वातावरण त्या ठिकाणी निर्माण होऊ शकते व दुसरी गोष्ट की, ज्या वेळा, समजा आता शुटींग बॉलची वेळ मिळाली तर त्यावेळेला आपण ते करुन घेऊ, कुस्तीची वेळ मिळाली त्यावेळेला करु, कबड्डीसाठी वेळ मिळाली तरी आपण करु शकू, खो-खोची वेळ मिळाली तरी करु शकतो आणि ह्या वेळेमध्ये त्यांच्या काही वेळा मिळाल्या नाही तर आपण तो विचार त्यांचा करु शकत नाही आणि आंतरशालेय बोलल्यानंतर प्राथमिक शाळा ते माध्यमिक ते ज्युनिअर कॉलेज आणि सर्व शाळा म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळा अशा नाही तर ज्या मिरा भाईंदरमध्ये खाजगी संस्था आहेत त्या संस्थांनीही भाग घेतला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

तीन दिवसांत खेळाचे आयोजन होईल का?

**मा. सभापती :-**

ते आयोजन आपण करणार आहोत ना!

**मिलन पाटील :-**

मुलं किती होतील आणि तेवढ्या स्पर्धा झाल्या पाहिजेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी जे तुम्हांला आम्हांला नियोजन होईल असे. आपण नियोजनाच्या बाहेर जाणार नाही ना. आपण सभेमध्ये बसून त्याची प्लॅनिंग करतोय. आपल्याला वाटले की, सर्व शाळांचा समावेश होऊ शकतो हा एक भाग. ह्या शाळेमध्ये कार्यक्रम होत असतांना जर अडचण निर्माण होऊ शकते. ह्या शाळा कमी होतील तर दोन भाग. त्या आपण कमी करु. दुसरी गोष्ट सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांनी सुचना मांडली की, या ठिकाणी हे जे गेम आहेत, ह्या ज्या स्पर्धा आहेत ह्या स्पर्धा अनेक विभागांत जर आपण डिस्ट्रीब्युट केल्या तर? कारण आपली प्रत्येक ठिकाणी कार्यालये आहेत, प्रत्येक ठिकाणी एस.आय. आहेत, प्रत्येक ठिकाणी प्रभाग अधिकारी आहेत, स्टाफ आहे, किमान चार ठिकाणी आपली प्रभाग कार्यालये आहेत, चार ठिकाणी आपले प्रभागाचे अधिकारी आहेत, चार ठिकाणी स्टाफ आहे, चार ठिकाणी आरोग्याचे अधिकारी आहेत, कर्मचारी आपल्याकडे आहेत. त्यामुळे आपल्याला कुठेही ताण पडावा हा विषय नाही. फक्त एका दिवशी त्यांना एकत्र आणावे लागेल, तो विषय वेगळा आणि बाकी डी-सेंन्ट्रलाईजप्रमाणे आपण वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या स्पर्धा करु शकतो आणि नविन सुचना या स्पर्धेमध्ये सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी मांडली, ती स्वागतार्ह आहे की, शहरातील महिला वर्गांनाही यामध्ये समावेश करायचे आहे. का? तर महिला महापौर असतांना महिलांनाही आपण कुठे प्रोत्साहन देतो अशी भावना या माध्यमातून होऊ शकते. म्हणून आपले अतिशय चांगले विचार या ठिकाणी मांडल्याबद्दल मी आपणा सर्वांच्या वतीने आपले स्वागत करतो. कारण महिलांनाही कुठेतरी आपण बाहेर आणले पाहिजे. मागच्या वेळेला महापौर चषकामध्ये अशी चर्चा सुरु होती की, महिलांची स्पर्धा, बास्केट बॉल, संगित खुर्ची ह्या विषयी चर्चा झाली होती. परंतु आपल्याला ते काही करता आले नाही. त्या उद्देशाने आपण त्यातही महिलांचा समावेश करुन घेऊ या आणि जे नियोजनामध्ये जेवढे गेम बसतील, जेवढे खेळ बसतील त्या खेळाप्रमाणे करु आणि या बाबतीमध्ये ज्या संघटना आहेत, ज्या असोसिएशन, क्रिडा असोसिएशन आहेत ह्यांना आपण संपर्क साधा. माझ्या माहितीप्रमाणे उपायुक्त साहेब, वसईला कला क्रिडा भरवण्यामध्ये अतिशय चांगल्या प्रकारचा सहभाग असतो आणि ह्याचा अभ्यासही आपल्याला चांगल्या प्रकारे आहे आणि त्याचा फायदा पूर्णपणे या मिरा भाईंदरच्या महापौर चषकामध्ये होऊ शकतो असा

विश्वास मी सर्व सदस्यांच्या वतीने येथे व्यक्त करतो. कृपया आपले जर तशा पद्धतीच्या गाईडलाईन असतील व त्या गाईडलाईनने जर आपण हा महापौर चषक भरवला व त्या सबंधित असोसिएशनला आपण जर संपर्क साधला तर चांगल्या पद्धतीने त्यांच्या वेळाही आपल्याला मिळू शकतील आणि ह्या स्पर्धा, हा महापौर चषक चांगल्या तहेने पार होईल असा मला विश्वास आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब आपल्याला महापौर चषकाला गेल्या वेळेला किती खर्च आला होता?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

गेल्या वेळेला साडे अठरा लाख रुपये एवढा खर्च आला होता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

यंदा किती खर्च आहे?

**केशव घरत :-**

बजेटमध्ये चाळीस लाख रुपयांची तरतुद आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण सदर विषयाबाबत सभा लावून निर्णय घेऊ की, किती खर्च करायचा, काय करायचे?

**मा. सभापती :-**

कमिटी बैठक घेऊ. आनंदाची गोष्ट अशी की, ताबडतोब सुचना मिळाली. २५, २६, व २७ तारखेमध्ये आपल्याला कुस्तीचा फंड मिळू शकेल.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सभापती साहेबांनी जो विषय मांडला व त्यावर जी सविस्तर चर्चा झाली ह्याच्याबाबत मागच्या वेळी ही चर्चा झाली होती की, अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. परंतु, अत्यंत कमी कालावधीत त्यामुळे नियोजनाच्या असंख्य अडचणी आपल्यासमोर आहेत. बेसिकली महापौर चषकसारखी सगळ्यांत मोठी स्पर्धा भरवत असतांना मा. सभापती आणि सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले तर अत्यंत चांगली स्पर्धा आणि सगळ्यांत मोठी स्पर्धा परंतु अत्यंत कमी कालवधीत ह्या दोन गोष्टीत तारेवरची कसरत आपल्याला करायला लागणार आहे. ज्यावेळी वसईचा कला क्रिडा महोत्सव चालू होतो त्याची सुरुवात किमान सहा महिन्यापासून चालू होते हा मुद्दा महत्वाचा आहे. येथे तीन-चार समित्यांचे महत्वाचे आयोजन आपल्याला करावे लागणार आहे. त्याच्यामध्ये जी क्रिडांगण समिती आहे, क्रिडा समिती आहे व इतर ह्याला चांगल्या पद्धतीने प्रसिद्धी मिळण्याकरिता जाहिरात समिती करावी लागेल. समन्वय समिती, स्टेअरिंग समिती, उद्घाटनाचा कार्यक्रम कशा पद्धतीने केला पाहिजे त्याचा त्याच्यात अंतर्भाव आणि वेगळे कर्मचारी नेमले पाहिजे. त्याच्यामध्ये संचलन हा एक पार्ट आहे, तो जर व्यवस्थित झाला नाही तर संपूर्ण स्पर्धेचे नियोजन बिघडते. त्यामुळे संचलनासाठी एक वेगळी समिती नेमून स्थायी समितीच्या सदस्यांपैकी एक सदस्य असे जे कोणीतरी जबाबदारी घेऊ इच्छितात त्यांना आपण ती जबाबदारी दिली पाहिजे आणि सगळ्यांत महत्वाचे म्हणजे या स्पर्धेसाठी अत्यंत कमी कालावधी असल्यामुळे आपण अजुन कुठल्याही शाळांना कळविले नाही. तर आपण शिक्षण अधिका-यांना स्थायी समितीच्या वतीने जबाबदारी दिली तर योग्य होईल की, सर्व शाळांचा सहभाग या स्पर्धेमध्ये झाला पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण शिक्षण अधिका-याला येथे बोलावून घ्या.

**मा. सभापती :-**

आपल्याला उद्या संध्याकाळी सभा घ्यायची आहे आणि प्रमुख अधिका-यांना बसून आपण त्या प्रोग्रामची रचना करु. अधिका-यांच्या स्तरावर आज सभा होऊ दे आणि आपण आपली सभा सोमवारी घेऊ. अधिकारी स्तरावर बसणे फार जरुरी आहे. आपली मानसिकता आणि आपल्या भावना आपण या ठिकाणी प्रकट केल्या आणि ते काम झाले पाहिजे या तहेने केलेले आहे. अधिकारी वर्ग कधीही कोणत्या कामात मागे पडले आहे असे मला आजपर्यंत जाणवले नाही. परंतु, त्यांना त्यांच्या पद्धतीने बसुन त्यांना त्यांची जबाबदारी देऊन त्याचे आज ब्रिफिंग झाल्यानंतर सोमवारी अधिकारी आणि आपण बसून ते फायनल करु.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

स्थायी समितीची सभा संपल्यानंतर आम्ही ताबडतोब अधिकायांची सभा घेतो आणि त्याचे नियोजन करतो. मागच्या वेळी हा विषय चर्चेला आला त्यावेळी आपण महत्त्वाच्या मुद्यावर चर्चा केली होती. त्याच्यामध्ये समन्वय समिती, क्रिडा समिती, स्वागत समिती, अर्थ समिती, जाहिरात समिती,

क्रिडांगण व्यवस्था, उद्‌घाटन सोहळा, वृत्तपत्र, समारोप सोहळा, शोभेचे दारुकाम आणि क्रिडा ज्योत संचलन हे जे महत्वाचे पाच सहा मुद्दे आहेत त्या प्रत्येक मुद्याची वेगळी कमिटी करुन आपण त्याचे नियोजन केले पाहिजे. त्या नियोजनासाठी अधिकारी स्तरावर आम्ही आमची सभा घेतच आहोत. तथापि, सोमवारी देखील ह्याच्याबद्दल आपण एक वेगळा निर्णय घेऊन ह्या कामाला जर सुरुवात केली आणि सगळ्यात महत्वाचे एवढे सगळे करुन जर स्पर्धक आले नाही तर आपण असे दोन्ही गोष्टी बघायला पाहिजे. सभापती साहेबांना अशी विनंती आहे की, आपल्या स्तरावर आपण संबंधित शिक्षण विभागाला आणि शिक्षण अधिका-याला आदेश द्यावे की, त्यांनी ती व्यवस्था करावी. बाकीच्या व्यवस्थेला सर्व अधिकारी सक्षम आहेत. परंतु, स्पर्धक त्या ठिकाणी येणे महत्त्वाचे आहे. ते जर आले नाहीत तर त्या दृष्टीकोनातून सभापती साहेब आपल्याला अशी विनंती आहे की, पुढचे मार्गदर्शन करावे आणि बाकीच्या सर्व अधिकायांना जबाबदारीचे वाटप करुन ही स्पर्धा जास्तीत जास्त कशी उत्कृष्ट होईल या दृष्टीकोनातून आमच्या प्रशासनाकडून सर्व प्रकारचे सहकार्य आपल्याला लाभेल. धन्यवाद!

**रिटा शाह :-**

जेवढ्या स्वरुपाचे खेळ आहेत त्याचे फॉर्म विभाग व्हाईज पाठवा. नगरभवनलाच सर्व फॉर्म ठेवू नका. प्रत्येक विभागात जवळपस असे फॉर्म ठेवा. जेणेकरुन लोकांना ते फॉर्म घ्यायला सोपे होईल आणि जिथे आपले स्ट्रक्चर आहे तिथे आपली दोन माणसे बसवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण केबललाही ॲड देऊ शकतो.

**मा. सभापती :-**

ज्या सुचना आहेत त्या आपण घ्या आणि त्या सुचनेप्रमाणे तुम्ही अधिका-यांना ब्रिफिंग करुन घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

ज्या शाळा आहेत त्याचे काम शिक्षण अधिका-यांवर सोपवून द्या. म्हणजे ते शाळेपर्यंत जाईल. प्रत्येकाला फॉर्म वाटण्यापेक्षा ते शाळेत जाऊन देऊन येतील.

**मिलन पाटील :-**

अध्यक्ष साहेब, याबाबतीत उपायुक्त साहेबांना मी अशी सुचना देऊ इच्छितो की, प्रत्येक शाळेत प्रत्येक क्रिडा शिक्षक असतो असे आपण जर दोन-चार शिक्षक बोलावले तर त्यांच्या सल्ल्याने आपल्याला एक चांगला अनुभव मिळेल आणि ते आपल्याला सांगतील की, ह्या दिशेने हा प्रोग्राम ठेवला तर तो आपल्याला सुलभ जाईल असे त्यांच्या सुचनासुद्धा आपण विचाराधिन घेऊन त्या एक-एक शिक्षकांना आपण बोलावून घ्या.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपण जी क्रिडा समिती नेमणार आहोत. प्रत्यक्ष काम करणारी समिती त्याच्यातला एक प्रमुख आपण आपल्यातला नेमू आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली जे सर्वच क्रिडा शिक्षक आहेत, फिजीकल डायरेक्टर किंवा क्रिडा अध्यक्ष ह्यांची सभा येथे आपण बोलावू, सोमवारी किंवा मंगळवारी आणि सोमवारी कुठल्या कुठल्या कमिटी तयार करु त्याचे हेडस् आपण आम्हांला ठरवून द्या. त्याप्रमाणे ते सुचविल्याप्रमाणे त्याची पुढील कार्यवाही चालू होईल.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेब, आपण सोमवारी जेवढे माध्यमिक शाळांमधील पी.टी. शिक्षक आहेत त्यांना बोलावून घ्या.

**केशव घरत :-**

शाळेला पत्र दिले तर ते आपले शिक्षक पाठवतीलच.

**मा. सभापती :-**

पुर्वतयारीसाठी तुम्हांला जे वॉलेन्टीअर लागतील आणि ते कम्प्लीटली त्या विषयाचे वॉलेन्टीअर लागतील. म्हणून जेवढे पी.टी. शिक्षक आहेत, माध्यमिक शाळेतील टोटल ८४ शाळा आहेत आणि ८४ शाळेतून जर तुम्हांला एक पी.टी. शिक्षक भेटला, १०० लोक आपल्याला महापौर चषक आयोजित करण्यासाठी तयार होतील. म्हणून शिक्षण अधिकारी आपण त्यांना सोमवारी बोलावून घ्या. कुठे आणि कधी संपर्क साधायचा आहे ते आपण उपायुक्त साहेबांना विचारुन घ्या आणि एकत्र येऊन ते काम करुन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, आपण दुसऱ्या विषयाला सुरुवात करण्याअगोदर एक सुचना मांडतो. सभापती साहेब, मिरा भाईंदर शहराचा प्रश्न आहे. घोडबंदर ते चेकनाका या परिसरामध्ये वाढते लेडीज बिअर बार आणि ०५/०२/२००५ च्या सामना वृत्तपत्रात हा रेड लाईट म्हणून घोषित करण्यांत आलेला आहे. तसेच छत्रपती शिवाजी मार्ग या मार्गावरही बिअर बार, लॉज भरपूर प्रमाणात आहेत. तर आपण ह्यांना परवानगी दिलेली आहे का, मिरा भाईंदर नगरपालिकेतून बांधण्यासाठी?

**केशव घरत :-**

सभापती साहेब, काशिमीरा नाका ते स्वागत बार जो आहे रात्रीच्या वेळी जे बार चालतात तिथे जशी जत्राच भरलेली असते. महापालिकेमार्फत त्यांना परवाना दिला जातो का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटीलजी, केशव घरतजी, आपण सुचना मांडली आणि यावेळेला अंदाजपत्रकाच्या मागच्या सभेमध्ये त्याच्यावर आपण चर्चाही केली आणि त्यांना जे परमिशन द्यावे लागते, कोणतेही उद्योग किंवा कोणतेही कामकाज, दुकान अन्य बाबतीमध्ये त्यांना ज्या परवानग्या प्राप्त होऊ लागतात त्या परवानग्या मिरा भाईंदर महानगरपालिकेला द्याव्या लागतात आणि त्याच्याशिवाय हे होऊ शकत नाही. हा विषय वेगळा झाला. परंतु, त्यांना प्राथमिक परवानगी दिल्यानंतर त्याच्यावर संपूर्णपणे बिअरबार, व्हिडीओ थिएटर्स त्याच्यावर संपुर्णपणे कंट्रोल कोणाचा असतो, तर पोलिस खात्याचा, पोलिस प्रशासनाचा असतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, साहेब आपल्या महानगरपालिकेचीही परवानगी घ्यावी लागते ना?

**मा. सभापती :-**

होय, परवानगी लागते.

**प्रेमनाथ पाटील :-**

बारसाठी परवानगी लागते ना? मग त्याच्यासाठी कंट्रोल पाहिजे ना. ०५/०२/२००५ च्या सामना वृत्तपत्रात रेड लाईट म्हणून घोषित करण्यांत आले आहे, घोडबंदर ते चेकनाक्यापर्यंत.

**केशव घरत :-**

हा विषय फार गहन आहे. आजच्या घडीला तिथे संपुर्ण भागात बिअर बार आहेत. परंतु, एकदा हायवेला स्टार्ट केले की पुढेपर्यंत संपुर्ण भागात बिअर बार दिसतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्या बाजुला मंदिर, शाळा आहेत. तरीसुद्धा त्यांना डायरेक्ट परमिशन देण्यांत येते.

**केशव घरत :-**

परंतु, हायवेच्या दोन्हीकडून जाणारा रस्ता आहे. तिथे जिथे बघितले तिथे बिअर बार. पहिल्यांदा जसे गोव्याला बिअर बार होते तसे आता आपल्या मिरा भाईंदरमध्ये सुरु होत आहेत. त्याच्यावर काहीतरी करा आणि ह्याच्यापुढे महापालिकेचे जर काही नियंत्रण असेल तर ह्याच्यापुढे कुठल्याही बिअर बारला परवानगी देऊ नये.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्याच्यापुढे कुठल्याही बिअर बारला परवानगी देऊ नये.

**सुर्यकांत भोईर :-**

शाळेपासून काहीतरी अंतर ठेवा, पाचशे मिटर, हजार मिटर असे.

**मा. सभापती :-**

याबाबत आपण पुढील विषय परवानाबाबत आहे त्यामध्ये चर्चा करु.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, सुधारित ठराव मला दिला आहे की, जो माझा वाद होता की, मी अनुमोदन केले होते आणि प्रेमनाथ पाटील ह्यांची सही घेतली होती. ते सुधारित करुन दिले त्याच्यात परत चुक केलेली आहे. त्याच्यात सुचक म्हणून माझे नांव लिहिले आहे. जेव्हा सन्मा. सदस्या प्रभात पाटील सुचक आहेत आणि अनुमोदन माझे आहे. मला हरकत नाही. तुम्ही सुचक म्हणून लिहिणार माझे नांव यायला पाहिजे तेवढीच माझी इच्छा होती आणि माझी सही घ्यायला पाहिजे तशी इच्छा होती. कारण विदाऊट माझ्या सहीने त्याचे इम्प्लिमेंन्टेशन झाले आहे, बिले दिली सर्व झाले आहे. म्हणजे नगरसेवकांच्या इज्जतीचे आणि हक्काचे येथे काही राहिलेलेच नाही.

**मा. सभापती :-**

या विषयी आपण कृपया खात्री करुन घ्या.

**रिटा शाह :-**

सुचक, अनुमोदन मी विरोध करत नाही. उद्या प्रभात पाटील करणार म्हणून मी सांगते की, त्यांची सुचना होती असे प्रोसिडींगमध्ये लिहिले आहे.

**मा. सभापती :-**

सुचना होती आणि ठरावाला सुचक असे वेगळे असू शकते.

**रिटा शाह :-**

मी ठराव मांडते असे प्रोसिडींगमध्ये स्पष्ट लिहिले आहे आणि मी अनुमोदन करत आहे असेही स्पष्ट लिहिले आहे. साहेब, आपण महत्वाची रुलिंग दिली होती की, जोपर्यंत माझी सही घेत नाही तोपर्यंत ते बिल अदा करायचे नाही. दिवाळी होती म्हणून मजबुरी होती म्हणून तुम्ही ते बिल अदा केले. पण आता तरी माझी सही घेतल्याशिवाय तुम्ही ते बिल पुढे द्यायचे नाही अशी माझी मागणी आहे.

**मा. सभापती :-**

सदर विषयाबाबत विषयपटलावरील विषय संपल्यावर मी रूलिंग देतो.

**प्रकरण क्र. १४१ :-**

सन २००४-०५ महापौर चषक आयोजित करणेबाबत.

**ठराव क्र. १५४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून दरवर्षी महापौर चषक स्पर्धा आयोजित करण्यांत येत आहे. सदर चषकांतर्गत विविध खेळाच्या स्पर्धा आयोजित करण्यांत येतात. सदर विविध स्पर्धेकरीता अधिकारी व नगरसेवक यांची कमिटी नेमून सर्व कामे पार पाडण्यात येतात. यावर्षी सुद्धा महापौर चषक अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन करावयाचे असून सदर कामी होणाऱ्या खर्चाकरीता निविदा मागवाव्या लागणार आहेत. तसेच रोख बक्षीसे व इतर कामी अग्रिम रक्कम द्यावी लागणार आहे. सन २००३-०४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर कामी रु. ४०.०० लक्ष एवढी तरतुद असून स्पर्धेकरीता होणारा खर्च सदर तरतूदीतून करावयाचा आहे. तरी महापौर चषक अंतर्गत विविध कामाकरीता निविदा मागविणे, अग्रिम देणे कामी या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. सभापती**

**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवानी प्रकरण क्र. १४२ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

मागच्या सभेमध्ये हा विषय आला होता त्यावेळी बजेटची तरतुद वृक्षप्राधिकरणाकरिता नव्हती. आता हा विषय आलेला आहे आणि माझे असे म्हणणे आहे, आपल्याला ही जी गाडी लागणार आहे. ती गाडी आवश्यक बाब आहे. परंतु, ह्याची आवश्यकता पूर्णपणे अग्निशमन दलाला होउ शकते. गोषवाऱ्यामध्ये तसे दिलेले आहे. विषय फक्त वृक्षप्राधिकरणाच्या माध्यमातून आलेला आहे. त्याचा समावेश हायड्रोलिक जी गाडी आपल्याला लागणार आहे त्याचा समावेश अग्निशमन दलामध्ये झाला पाहिजे आणि ही गाडी श्री. इरकरजी ही गाडी तुम्ही अग्निशमन दलाच्या कंपाउन्डमध्ये ठेवायची. चर्चा झाल्यानंतर आपण ठरावामध्ये तसे नमुद करून घ्या. कारण आपल्याला गाडी असणे आवश्यक बाब आहे आणि जी गाडी तुम्ही ४०७ दाखवली आहे ती गाडी ७०९ व जी टाटा कंपनीची आहे.

**मिलन पाटील :-**

एवढी मोठी गाडी काय करायची आहे?

**केशव घरत :-**

एवढा मोठी टेम्पो आहे, मोठा आहे त्याची पेटी लांब आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी गाडी घ्यायला पंधरा लाखाची तरतुद आहे आणि जेवढी मोठी गाडी आणि चांगली कॅपेसिटी मिळेल, तेवढी गाडी अग्निशमन दलाच्या कामाला येउ शकेल म्हणजे आपण मल्टीपरपज करतो. वृक्षप्राधिकरणाला गाडी पाहिजे असा विषय मागच्या वेळेला आणला आणि आजच्या गोषवाऱ्यात तसा मी उल्लेख केलेला आहे. मग ठळकपणे असा उल्लेख झाला पाहिजे की, जी गाडी ७०९ ची अतिसक्षम गाडी असेल तर ती अतिसक्षम गाडी आपल्याला अग्निशमन दलाला वापरता येईल आणि अग्निशमन दलाच्या अखत्यारीमध्ये गाडी राहिली पाहिजे आणि त्याला प्राधान्य हे अग्निशमन दलाला असेल. कारण एखाद्या ठिकाणी आग लागली व एखादे झाड तोडायचे आहे तर ती गाडी पहिल्यांदा कुठे गेली पाहिजे, तर आग विझवायला पहिले जाईल.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

पण झाडे आहेत कुठे तोडायला?

**सुर्यकांत भोईर :-**

आहेत ना, सृष्टीमध्ये आहेत.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपण झाडे फक्त वर्षातून एकदाच तोडतो, तुम्हाला कल्पना असेल जेव्हा गणपती सण येतो तेव्हाच झाडे तोडतो. तर आपण ही गाडी खरेदी करण्यापेक्षा ती भाड्याने घेतलेली बरी आहे. एकदाच आपण झाड तोडतो तर आपण कशासाठी पैसे इन्व्हेस्ट करायचे आणि त्याचे मेनटेनन्स ही आपल्याकडे नीट होणार नाही.

**मा. सभापती :-**

गाडी घेण्याकरिता पंधरा लाखाची वृक्षप्राधिकरणाच्या बजेटमध्ये तरतुद आहे. अनेक वेळा विषय आपण आणला आणि विषय आणल्यानंतर दोनदा या विषयावर चर्चा झाली आणि आपण ती गाडी भाड्याने ठेवावी, अशा प्रकारचा ठराव करून पाठवला. परंतु, तो ठराव केल्यानंतर आपण भाड्याने गाडीची मागणी केली पण भाड्याने गाडी मिळाली नाही. म्हणून मी तुम्हाला या ठिकाणी अपील करतो की, अपीलपेक्षा विनंती करतो की, आपण जर ही गाडी अग्निशमन दलामध्ये आणली म्हणजे अग्निशमन दलाचा पैसा आणू शकतो, लागतो. त्यावरही समजा, वृक्षप्राधिकरण समिती मधून जर त्याची पुर्तता होउन कारण वृक्षप्राधिकरण समितीमध्ये जसे सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्सजी बोलले की, त्यांना ती गाडी किती वेळा लागते आणि ही वस्तुस्थिती आहे. त्यांना गाडी फार कमी वेळा लागेल आणि म्हणून जर अग्निशमन दलाला त्याचा वापर करायला दिला आणि त्याच्याकरिता आपण जर सक्षम गाडी मागवली तर आपल्या अग्निशमन दलाला वापर होईल व वारंवार दुसरी एक गाडी आहे मी त्याच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली ती गाडी जर आपल्याला पाहिजे असेल तर त्या गाडीला तीन कोटी रुपयाचा खर्च आहे. जी गाडी मुंबई महानगरपालिकेमध्ये लावायला लागते, जी शिडी असते ती टॉवरच्या वर जाते त्याला तीन कोटी रुपयाचा खर्च आहे. आपण तीन कोटीचा खर्च करण्यापेक्षा आपल्याकडे सात माळ्याचे तेवढे टॉवर नाही. चौदा माळ्याचा टॉवर फक्त दोन मिरा रोड येथे सिल्वरपार्क येथे आहे आणि बाकी टॉवर लहान आहेत, सात माळयाच्या जवळपास आहेत. आपल्याला ही जी अतिसक्षम गाडी पंधरा लाखाच्या पर्यंत जर आपल्याला अतिसक्षम गाडी भेटली तर आपल्याला बऱ्याचशा ठिकाणी जवळ जवळ इंड्रस्टीमध्ये चार माळ्याचे बिल्डिंग आहेत त्याकरिता कामाला येईल म्हणून वृक्षप्राधिकरण समितीच्या माध्यमातून आपण हे काम करू शकतो आणि ती गाडी अग्निशमन दलाच्या ऑफीसमध्ये, अंगणात राहिली पाहिजे अशापद्धतीचे आपण नियोजन करा म्हणजे वृक्षप्राधिकरण समितीला आपण वारंवार गाडी मागितली त्याची ४०७ ची मागणी आहे आणि ७०९ ची मागणी करतो म्हणजे अतिसक्षम गाडी मागवतो त्याच्यात ह्यांचेही काम होउ शकते आणि त्यांचे ही काम होउ शकते आणि काही सन्मा. सदस्यांची अस्मिता आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये अश्वारुढ पुतळा छत्रपती शिवाजी महाराजांचा असताना त्याला लिफ्ट नसल्या कारणाने साफसफाई करता येत नाही, याबाबत आपण मागे चर्चा केली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

जी लिफ्ट होती त्याचे काय झाले?

**मा. सभापती :-**

ती लिफ्ट मोडतोड झाली. ती लिफ्ट चालवून घेवून जायची होती आणि त्या लिफ्टला मोडतोडीला वर्ष झाले आहे. म्हणून आपल्याला ही गाडी मल्टीपरपरजसाठी कामाला येणार आहे

म्हणून त्याकरिता जर आपण ह्या पद्धतीने घेतली तर त्याचा अग्निशमन दलाकरिता वापर होईल आणि वृक्षप्राधिकरण समितीला महिन्यातून एकदा किंवा वर्षातून चार वेळा कामाला येणार आहे.

**गजानन भोईर :-**

आम्हाला हे सगळं मान्य आहे. पण वृक्षप्राधिकरणाबद्दल आमचे, आपले अधिका-यांचे किती ठाम मत आहे हे माहित नाही. पण मागे आम्ही वारंवार वृक्ष लागवडीचे सांगितले होते. म्हणजे आपण सर्व सुविधा द्यायच्या आणि अधिका-यांनी सूचना ही द्यायच्या नाहीत व विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे नाही फक्त येथे ही मशीन पाहिजे, त्या गाडया पाहिजेत ते आम्ही पास करून द्यायचे. खरंतर या गाडीची गरज नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मी, आपल्याला खुलासा केली की ह्याची आवश्यकता नाही. पण त्याची आवश्यकता आपण पुर्णपणे अग्निशमन दलाकरिता आणि आपल्या या शहराकरिता करू शकू. ही गाडी घेण्यामागे ही भावना आहे, असे मला बोलायचे आहे. पंधरा लाखाची गाडी भाड्याने आणायचा त्यांनी प्रयत्न केला आणि गाडी असावी अशी भावना प्रत्येकाची आहे. परंतु, या गाडीचा वापर पुर्णपणे अग्निशमन दलाला होत असेल तर आपल्या शहराला त्याचा उपयोग होणार आणि त्या पद्धतीने ठराव करा की, ह्याचा संपूर्ण वापर या ठिकाणी झाला पाहिजे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, १९ तारखेला शिवजयंती आहे. या जयंतीच्या निमित्ताने काशीमिरा नाक्यावरील पुतळा, शिवाजी महाराजांचा तो स्वच्छ करून घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

अग्निशमन दल या गाडीचा कुठल्या प्रकारे उपयोग करून घेणार आहे?

**रिटा शाह :-**

साहेब, ही जी गाडी आहे त्याची शिडी आहे ती किती माळ्यापर्यंत जाणार?

**जोजफ घोन्सालवीस :-**

अग्निशमन दलाचे जे अधिकारी आहेत त्यांनी याबाबत खुलासा करावा.

**गजानन भोईर :-**

अग्निशमन अधिका-याने ह्याचा खुलासा करावा की, त्या गाडीचा उपयोग अग्निशमन दलाला कसा होणार आहे?

**मा. सभापती :-**

या गाडीचा उपयोग आपल्याला किती होईल आणि ती गाडी किती माळ्यापर्यंत वर जाउ शकेल?

**क्लासो फर्नांडिस :-**

या गाडीची कॅपेसिटी जास्तीत जास्त दोन ते तीन माळ्यापर्यंतची आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला टॉवर पर्यंत जाईल अशी गाडी पाहिजे.

**क्लासो फर्नांडिस :-**

तीन माळ्यापर्यंत ही गाडी जवळ जवळ जाईल. एवढीच या गाडीची कॅपॉसिटी आहे. ह्याच्यात एसक्यू करू शकत नाही, पण वरून पाणी वगैरे मारू शकतो.

**रिटा शाह :-**

त्याच्यापेक्षा जास्त कमीत कमी सहा माळ्यापर्यंत जावू शकेल अशी गाडी बघा.

**गजानन भोईर :-**

तुम्हाला त्याचा उपयोग काय होईल?

**क्लासो फर्नांडिस :-**

उपयोग म्हणजे, आम्ही वरुन पाणी मारू शकतो. एखाद्या फॅक्टरीला आग लागली असेल तर पाणी मारू शकतो.

**रिटा शाह :-**

गाडी मागवायची असेल तर चांगलीच गाडी मागवून घ्या.

**गजानन भोईर :-**

पाणी टँकरमधून मारणार.

**क्लासो फर्नांडिस :-**

पाणी आम्ही आमच्या गाडीतून मारणार.

**गजानन भोईर :-**

तिसऱ्या माळ्यापर्यंत तुम्ही तो पाईप कसा घेवून जाणार?

**क्लासो फर्नांडिस :-**

त्याच्यात लिफ्ट असते व बकेट टाईप असल्यामुळे त्याच्यात माणूस उभा राहून वर जावू शकतो.

**मा. सभापती :-**

सध्या बी.एस.ई.एस.कडे आहे ती गाडी का?

**क्लासो फर्नांडिस :-**

बी.एस.ई.एस.कडे आहे त्याप्रमाणे ती गाडी आहे. ती गाडी स्पेशली फायर फायटिंग येणार नाही.

**मा. सभापती :-**

ती जी गाडी असते, ती शिडीसह पुढे सरकते ती तीन कोटीची गाडी आहे. ती शिडीसकट गाडी घ्यायला जाउ तर त्याला आपल्याला जास्त बजेट लागेल.

**रिटा शाह :-**

सहा माळ्यापर्यंत जाईल अशी गाडी घ्यावी.

**क्लासो फर्नांडिस :-**

त्याची किंमत जास्त आहे. ती इम्पोंटेड आहे ती गाडी १८० फुट एवढी वर जावू शकते.

**मा. सभापती :-**

सध्या आपल्याकडे काहीच सुविधा नाही, फायर फायटर होउ शकेल.

**गजानन भोईर :-**

फायरच्या बाबतीत जास्त तक्रारी कोणाच्याही नाही की, ह्या गाडीने आग विझली जात नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य एखादी घटना सांगून घडत नाही.

**गजानन भोईर :-**

ह्याची काही आवश्यकता नाही.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर साहेब, आपल्या महापालिकेचे फायर स्टेशन आहे तर आपल्याकडे एखादी सुविधा असणे गरजेचे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आजच्या तारखेला आपल्याकडे ही सुविधा नाही.

**गजानन भोईर :-**

सुविधेचे पालन कुठपर्यंत होते, एखाद्या ठिकाणी पश्चिमेला मागे सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडीया यांनी विषय काढला होता की, एक तास आग लागून गेली तरी त्या जागेवर फायर बिग्रेडचे अधिकारी कोणीही पोहोचले नव्हते. म्हणजे आपण एखादी वस्तू त्यांना द्यायची०, जसे मगाशी सांगितले की, लिफ्ट दिली आणि ती मोडतोड झाली. त्याचे रिपेरिंग होत नाही आणि ही हायड्रोलिक मशीन आहे ह्याचे रिपेरिंग कुठपर्यंत होईल, ह्याचा अधिकाऱ्यांनी विचार करावा.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने, प्रकरण क्र. १४२ हायड्रोलिक शिडीसह वृक्षछाटणी वाहन खरेदीबाबत फेरविचार करणेबाबत या विषयावर ठराव देणे अगोदर सन्मा. सभापती साहेबांच्या निदर्शनास व स्थायी समितीच्या निदर्शनास आणू इच्छितो की, आपल्या अग्निशमन दलामध्ये कार्यरत असलेले अधिकारी श्री. क्लासो फर्नांडिस ह्यांनी राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथून जी परिक्षा दिली होती, मला वाटते आपल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांचा आणि नंबर चारचा कुठेतरी योग जुळून आलेला दिसतोय कारण मागेसुद्धा श्री. बेलवटे चौथ्या क्रमांकाने पहिल्या चारमध्ये त्यांचा नंबर लागलेला होता आणि येथे सांगण्यास आनंद होत आहे आणि सभापती साहेबांच्या परवानगीने सांगू इच्छितो की, आपले अधिकारी क्लासो फर्नांडिस हे सुद्धा संपुर्ण राष्ट्रीय स्तरातून चौथ्या क्रमांकाने डिस्टींक्शनमध्ये पास झालेले आहे आणि आजची ही सभा त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. १५४ अ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलामध्ये कार्यरत असलेले अधिकारी श्री. क्लासो फर्नांडीस हे राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपुर येथून राष्ट्रीय स्तरातून चौथ्या क्रमांकाने पास झालेले आहेत. तरी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव ही स्थायी समिती करीत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**हॅरल बोर्जीस :-**

त्याचप्रमाणे सभापती महोदय, आजचा विषय नसला तरी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की बरेचसे आपले साफसफाईचे कर्मचारी अग्निशमन दलामध्ये काम करत आहे. त्यांना अगदी धोका पत्करून सुद्धा काम करावे लागते अशा कर्मचाऱ्यांना चांगल्या पद्धतीच्या ट्रेनिंग दिले पाहिजे. कारण शहराची संपूर्ण जबाबदारी सांभाळताना काही कर्मचाऱ्यांना धोका उत्पन्न होउ शकतो. त्या अनुषंगाने या गोष्टीवर सुद्धा आपण विचार करावा आणि आजचे प्रकरण क्र. १४२ हायड्रोलिक शिडीसह वृक्षछाटणी वाहन खरेदीबाबत फेरविचार करणे. या विषयासाठी हायड्रोलिक शिडीसह टाटा मॉडेल ७०९ सहा चाकी वाहन शासकीय दराने खरेदी करणे व त्या गाडीवर बॉडी बांधण्यास आजची ही सभा मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडीत आहे.

**केशव घरत :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १४२ :-**

हायड्रोलिक शिडीसह वृक्ष छाटणी वाहन खरेदी करणेबाबत फेरविचार करणेबाबत.

**ठराव क्र. १५५ :-**

हायड्रोलिक शिडीसह वाहन खरेदी करणेबाबतचा ठराव मा. वृक्ष प्राधिकरण समितीने मंजुर केला होता (दि. १४/०६/२००४) व पुढील कार्यवाही मा. स्थायी समितीच्या दि. २४/०६/२००४ च्या बैठकीत ठेवला होता. परंतु मा. स्थायी समितीने सदर वाहन खरेदी न करता ते भाड्याने घ्यावे असा ठराव केला होता. मा. स्थायी समिती सभेच्या ठरावानुसार सदर वाहन भाड्याने घेणेकरीता जाहिरात वृत्तपत्रात प्रसिद्धी करण्यांत आली होती. (दि. २६/०८/२००४ दै. लोकमत व दै. सकाळ) परंतु, दिलेल्या जाहिरातीनुसार कोणत्याही ठेकेदारांनी निविदा दिलेली नाही. त्यामुळे वाहन भाड्याने घेणे शक्य होत नाही. तरी सदर वाहन हे महानगरपालिकेचे विविध विभागांना गरजेचे असून ते वृक्ष प्राधिकरण व अग्निशामक विभागाला तरी अत्यंत गरजेचे आहे. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण झाले आहे. त्यातील पुर्णावस्थेत वाढलेल्या झाडाच्या फांद्या वेळोवेळी तोडणे गरजेचे असते त्यामुळे झाड कोसळण्याची शक्यता कमी असते. उंच उंच वाढलेल्या झाडांची छाटणी कामगारांमार्फत केल्यास अपघात होण्याची शक्यता आहे व असे अपघात झालेले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करुन वृक्ष प्राधिकरण समितीने दि. २०/११/२००४ च्या सभेमध्ये ठराव मंजुर करुन हा विषय फेरविचारासाठी पुन्हा मा. स्थायी समितीकडे सादर करावा असे सर्वानुमते ठरले. तरी हायड्रॉलिक शिडीसह टाटा मॉडेल - ७०९ वाहन शासकीय दराने खरेदी करणेस व त्या गाडीवर बॉडी बांधण्यासाठी व ही गाडी अग्निशामक दलाच्या अखत्यारीत राहील असा ठराव ही सभा सर्वानुमते करीत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्रीम. रिटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४३ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, ही जी टिपणी आहे तर एक वृक्षाकरिता किती खर्च येणार आहे.

**मा. सभापती :-**

श्री. इरकरजी याबाबत खुलासा करा.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, खुलासा करणे अगोदर मी आपल्याला शंका विचारतो, ही निविदा आपल्याला द्यायची आहे का, दिलेली आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

वृक्ष मोजण्यासाठी द्यायची आहे.

**मा. सभापती :-**

निविदा दिलेली आहे आणि ती फक्त मंजूरीसाठी आपल्याकडे आलेली आहे.

**गजानन भोईर :-**

मंजूरीसाठी आले आहे ना, मग ऑलरेडी नाव तयार झाले आहे का, की गजानन भोईरला वृक्ष छाटणीकरिता द्यावे असे आलेले आहे? एम.ए.सी.पी.ए. नक्की काय आहे? त्यांनी ऑलरेडी ठाण्यामध्ये, नांदेडला काम केलेले आहे म्हणजे त्याच्या निविदा आपण मागवल्या का? ही जी संस्था आहे, या संस्थेने ठाण्यामध्ये काम केलेले आहे. तर ह्यांना काम दिले आहे का? निविदा काढली आहे? निविदा काढण्यासाठी आपण मंजूरी घेत आहोत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सा़े.) :-**

निविदा काढण्यासाठी नाही, निविदा आलेल्या आहेत.

**गजानन भोईर :-**

म्हणजे आपण निविदा काढतोय.

**मा. सभापती :-**

यापूर्वी या सभागृहाने निविदा काढावी म्हणून मंजूरी दिली, या सभागृहाने निविदा द्यावी म्हणून आपण हा विषय मंजूर केल्यानंतर ह्या निविदा दिल्या गेल्या आणि त्या निविदा मंजूरही झालेल्या आहेत.

**गजानन भोईर :-**

मंजूरीला आलेल्या आहेत. म्हणजे एखाद्या संस्थेला दिलेले नाही. पण आम्हाला वाटते की, एखाद्या संस्थेला दिलेली आहे म्हणजे आम्ही आमची एक शंका विचारतो.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सा़े.) :-**

नाही.

**गजानन भोईर :-**

एखाद्या गोष्टीचा, आम्ही सांगतो की सभापती साहेब चांगले आहेत त्यांचा उहापोह करणे म्हणजे मी त्यांना मस्का पॉलिश लावणे असे तर हे नाही आहे ना!

**हॅरल बोर्जीस :-**

आपण कमीत कमी दराची निविदा स्विकारत असतो.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सा़े.) :-**

मागच्या सभेसमोर निविदेसाठी मंजूरी दिली व त्याच्यानंतर निविदा मागवल्या आणि कमी दराची निविदा आपल्याला मंजूर करायची आहे आणि तो प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी आपल्यासमोर आहे त्यानंतर त्याला कार्यादेश देवून पुढचे काम सुरू करण्यात येणार.

**गजानन भोईर :-**

म्हणजे जी निविदा कमी दराची आहे त्या निविदेला मान्यता दिली जाईल.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सा़े.) :-**

तसे स्टेटमेंटचा गोषवारा सोबत जोडलेला आहे.

**गजानन भोईर :-**

आपण जी वृक्षगणना करणार व सात रुपये वीस पैशानी देणार म्हणजे जी आपण गणना करणार त्या झाडाला नाव देणार, की एक, दोन, तीन, चार असे क्रमांक देणार की मिरा भाईंदर महानगरपालिकेचा रंग लावू जसे आपण सदर ही झाडे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आहेत असे करणार? म्हणजे नेमके काय करणार? जसे ही अमुक झाडे आब्यांची आहेत, ह्याची आहेत, असे नक्की काय करणार?

**मिलन पाटील :-**

याबाबत आपण श्री. इरकरला विचारा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

याबाबत मी आपणाला माहिती देतो, श्री. इरकरने सांगण्याची आवश्यकता नाही, मी आपल्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देतो. वृक्ष गणना जी करायची आहे त्याकरिता दर आलेले आहेत त्याच्यावरून आपण अंदाज केला असेल की, कदाचित एक झाड मोजायला एवढे पैसे कशाला पाहिजे? बेसीकली ही सायन्टीफिक संस्था आहे. ह्याच्यामध्ये आपल्याला जी सविस्तर माहिती पाहिजे ती उपलब्ध करून देता येईल. या संस्थेने आतापर्यंत ठाणे किंवा इतर महानगरपालिकेत काम केलेले आहे. संपूर्ण शहरात वृक्षाची गणना ही संस्था करणार आहे. त्यानुसार वृक्षाची वर्गीकरण जे आहे ते वर्गीकरण करणार.

**मिलन पाटील :-**

वर्गीकरण म्हणजे नेमके कसे? हे झाड सागाचे आहे, चिंचेचे आहे, आंब्याचे आहे कसे करणार?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

होय, असेच करणार व त्याप्रमाणे ग्रेडेशननुसार त्याला क्रमांक देणार व क्रमांक दिल्यानंतर त्याचा पूर्णपणे रिपोर्ट तयार करणार व त्या रिपोर्टची सी.डी. सुद्धा तयार करणार आणि हे सर्व रिपोर्ट आणि अहवाल त्याच्यामध्ये कुठल्या कुठल्या झाडाचे प्रमाण किती आहे? त्याची टक्केवारी काय? हे सगळे वर्गीकरण करून इंतभूत जो अहवाल आहे मिरा भाईंदर महानगरपलिकेतील वृक्षांचा, तो अहवाल आपल्याला देणार आणि त्याच्या सी.डी. सह तो अहवाल आपल्यासमोर देणार.

**मिलन पाटील :-**

ते झाड कुठे आहे? त्याची मार्कींग कुठे आहे?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

मार्कींग वगैरे सर्व असणार.

**मिलन पाटील :-**

ते लोक आम्हाला त्याचे प्लान देणार आहे का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

हा डिटेल सर्व्हे आहे.

**मिलन पाटील :-**

समजा, आंब्याचे झाड आहे ते उड्डाणपुलाच्या बाजूला आहे आज ते होते आणि उद्या समजा ते कोणीतरी तोडले ते आपल्याला त्यावेळेला कळलं पाहिजे की, ह्या रिपोर्टमध्ये हे झाड ह्या ठिकाणी दाखवलेले आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

याबाबतीत वेगवेगळ्या महानगरपालिकेचा जो रिपोर्ट तयार केलेला आहे, तो रिपोर्ट देखील आपल्याला पाहायला उपलब्ध आहे.

**मिलन पाटील :-**

आपल्याला इतर महानगरपालिकेची आवश्यकता नाही.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, माझी एक शंका आहे, तो रिपोर्ट अगोदर मागवून घेवून कोणत्या प्रकारचा रिपोर्ट आहे त्याच्यावर काय काय दाखविले जाते? ह्याची आपण शहानिशा करा.

**मिलन पाटील :-**

तो रिपोर्ट आम्हाला द्या ना!

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

पहिला प्रस्ताव ज्यावेळी प्राथमिक स्वरूपाचा मान्यतेसाठी मा. स्थायी समितीसमोर आला होता. त्यावेळेस ह्याच्यावर इंतभूत चर्चा झालेली आहे. आता परत त्याच्यावर आपण चर्चेची मागणी करता म्हणजे पहिल्यांदा विषयाला मान्यता देताना आपण हे सर्व पाहिलेले आहे, त्याच्यामध्ये कशा प्रकारचा सर्व्हे करणार? काय करणार? कुठल्या कुठल्या संस्था त्याच्यामध्ये आहेत? कुठल्या कुठल्या महानगरपालिकेचा सर्व्हे केलेला आहे? कायद्याची तरतुद आणि त्याचे फंक्शनिंग ह्याच्याबद्दलची सविस्तर चर्चा झालेली आहे.

**मिलन पाटील :-**

ही गणना करताना वन खात्याची झाडे मोजली जाणार का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

ह्या गणनेमध्ये वनखात्याची झाडे मोजली जाणार नाहीत. जंगलक्षेत्र आणि खारफुटीची झाडे मोजली जाणार नाहीत. ह्याच्यामध्ये निविदा दर सूचीचा जो फॉर्म आहे तो जर आपल्याला पाहिजे असेल तर त्याची सिंगल कॉपी इमिजिऐट देतो की, त्याच्यामध्ये आपल्या टर्म्स ॲण्ड कन्डीशन काय काय आहेत ह्याचा देखील उल्लेख आहे.

**केशव घरत :-**

आम्हाला एक एक कॉपी द्यावी.

**रिटा शाह :-**

हे फॉर्म आपण आम्हाला पहिले द्यायला पाहिजे होते.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

आपण सुरूवातीला चर्चा केली आहे. आपण त्यावेळेची प्रोसिडिंग काढून बघा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेंब, किती मोठ झाड हे झाड म्हणून गणले जाईल. साधारण एखादे रोपटे किती मोठे असेल तेव्हा ते झाड म्हणून गणले जाईल.

**रिटा शाह :-**

झाडाची गणना होणार की प्लान्टेशनचीसुद्धा गणना होणार.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

आपण गवत मोजायचे बोलले तर एक एक पानाचे गवत होईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

म्हणजे तुम्ही झाड कशाला बोलणार?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

तशी डेफिनेशन आहे. वृक्षाची डेफिनेशन आहे.

**अनंत पाटील :-**

साहेब आपण खाजगी झाड पण घेणार का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

फक्त जंगल व खारफुटी सोडून खाजगी वगैरे सर्व येणार.

**गजानन भोईर :-**

ह्याच्याकरिता आपल्याला साधारण खर्च किती येईल.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

किती लावले आहेत हे वृक्ष मोजल्याशिवाय माहिती कसे होईल?

**गजानन भोईर :-**

म्हणजे आपण अजून मोजले नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

मोजले नाहीत म्हणून ते किती होतील ते सांगता येत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

उपायुक्त साहेब, बारा हजार झाडे फक्त आपल्या महानगरपालिकेकडून लावण्यात आलेली आहे त्यापैकी जिवंत झाडे किती आहेत?

**गजानन भोईर :-**

बारा हजार आपली ती झाडे आणि पहिल्याचे कमीत कमी अठरा हजार झाडे असतील. बारा आणि अठरा तीस झाले, तीस गुणीले सात एकवीस झाले. इरकर साहेब आपली जुनी बारा हजार झाडे व्यवस्थित आहे ना!

**केशव घरत :-**

ते शोधायचे आहे म्हणून तर आपल्याला गणना करायची आहे ना, जिवंत किती झाडे आहेत, मेलेली झाडे किती आहेत?

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, झाडे मोजायची आहेत व किती झाडे मेली व किती झाडे जिवंत आहे याबाबत आपले मागच्या सभेत चर्चा झालेली आहे. आता आपल्याकडे जी निविदा आली आहे त्याच्यावरून

आपल्याला समजणार आहे की, किती झाडे जिवंत आहे आणि किती झाडे मेलीत. पण मेलेल्या झाडाचीही आपल्याला किंमत चुकवायची आहे ते मान्य करावे लागणार. कारण मेलेले झाड आहे ते बघितल्याशिवाय ते झाड मेले असे कसे बोलणार? त्याचेही आपल्याला सात रुपये द्यावे लागेल आणि जिवंत झाडाचेही सात रूपये द्यावे लागेल. मग त्याच्यावरून आपल्याकडे रिपोर्ट येणार की किती झाड जिवंत आहे आणि किती मेलेली आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

मॅडमचा जो गैरसमज आहे त्याची माहिती देतो, महानगरपालिकेने लावलेल्या झाडांची गणना नाही हे स्वतःहून उगवलेले असे जे आहे असे सरसकट झाडांचा त्याच्यामध्ये उल्लेख आहे. त्या सर्वांची आपल्याला गणना करायची आहे.

**मिलन पाटील :-**

त्याच्यामध्ये कोणाच्याही बंगल्यामध्ये झाडे लावली असतील ते ही येणार का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

होय, खाजगी सोसायटीमधील झाडांची गणना देखील आपण करणार. फॉरेस्टच्या जागेची आणि खारफुटीची जागा त्यात अंर्तभूत नाही.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, या अगोदर ह्या संस्थेने कुठल्या महानगरपालिकेत काम केले आहे का? वृक्ष गणना केली आहे का?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

आपण त्याच्यावरुन स्टेटस ठेवतो. आपल्या शहरामध्ये किती झाडे आहेत? आता आपण फक्त सरकारी झाडे मोजली तर सरकारी झाडाला पिंजरा देतो सर्व करतो म्हणजे ते कोणाच्या आधाराने असतात व बिगर आधाराची जी झाडे आहेत, ज्याला कोणाचा आधार नाही तरी वाढलेली आहेत अशा एकूण झाडांचा स्टेट्स किती आहे? मिरा भाईंदर शहरामध्ये झाडे किती? हे आपल्याला कळेल.

**रिटा शाह :-**

माझा बोलण्याचा अर्थ असा होता की, मेलेली झाडे बोलली त्यापेक्षा बिनवारशी बेवारस आणि वारसदार ते सर्व आपल्याला गणना करायचे आहे तर मला असे वाटते की, गणना केल्यानंतर आपल्याकडे झाड किती त्याचा रिपोर्ट येणार आणि ते करणे गरजेचे आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

त्याला कायदेशीर तरतुद आहे आणि वृक्ष गणना आपल्याला केली पाहिजे.

**रिटा शाह :-**

करायला पाहिजे, म्हणजे आपल्याला हे काम करायचेच आहे. त्यात दुमत नाही. ते काम करून घ्यावे असा मी ठराव मांडते.

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

या संस्थेने कुठे गणना केलेली आहे, ह्याचा तपशील द्या की, अशी गणना कुठल्या महानगरपालिकेत केलेली आहे?

**नागेश इरकर :-**

ठाणे आणि नांदेड महानगरपालिकेत केलेले आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

इनव्हायरमेंटल ॲण्ड बायटेक्नॉलॉजी फाउन्डेशन आहे ही मुंबईची संस्था आहे, ह्याच्या बद्दलची सविस्तर माहिती वन विभागाकडे उपलब्ध आहे. या संस्थेने ह्यापूर्वी ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये वृक्षाची गणना केलेली आहे. नांदेड वागळा महानगरपालिकेच्या हद्दीमध्येही वृक्षांची गणना केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

ठराव करण्याच्या अगोदर आम्ही जी माहिती मागवली होती, त्यावेळेला ते झोपले होते का? आता उठून सांगायला लागले, ठराव पूर्ण झालेला आहे. आता त्या माहितीचा आधार काय? कशाकरिता ती माहिती पाहिजे? अगोदर झोपला होता, आम्ही हाच प्रश्न त्यांना विचारला होता की कोण होते, ह्या संस्थेने कुठे काम केले आहे. त्यांना आता जाग आली का? त्यांना अगोदर कळले नाही का, सभासद काय मागतात?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य ज्यावेळेस भोईर साहेबांनी हा प्रश्न उपस्थित केला त्यावेळेला उपायुक्त साहेबांनी माहिती मिळवली तेव्हा त्यांनी सांगितले की, सदरची जी कमी दराची निविदा आपण मंजुर करतोय त्यांनी अशा अशा महानगरपालिकेमध्ये असे काम केलेले आहे.

**मिलन पाटील :-**

हे आपल्याकडे ज्यावेळेला चर्चेला आले होते त्यावेळी त्यांनी सांगायला पाहिजे होते की, अमुक अमुक ह्याच्यात आहे व मान्यता देण्यासाठी हा विषय आलेला आहे. अधिका-यांना तेवढे कळायला पाहिजे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, ह्याच्यामध्ये ही निविदा मी परत परत सांगतो हा ज्यावेळेस प्रस्ताव प्राथमिक मंजुरीकरिता स्थायी समितीसमोर आला होता त्यावेळी ही कायदेशीर तरतुद कशी आहे हे समजावून सांगितले होते. ही संस्था म्हणजे त्यावेळेस कोणती संस्था हे माहिती नव्हते. पण ती कशा पद्धतीने काम करेल ह्याची माहिती दिली होती. साधारणपणे अंदाजित त्याला खर्च येईल ह्याची माहिती दिली होती आणि आता निविदा यायच्या पुर्वी त्या संस्थेचे नांव माहिती नव्हते की, कुठली संस्था ती निविदा भरेल आणि काम करेल व निविदा भरल्यानंतर ज्या संस्था आलेल्या आहेत त्या संस्थांपैकी ही एक संस्था आहे. त्यामुळे आपण त्यावेळेस सुरुवातीला विचारले असेल तर वन विभागाचे अधिकारी त्यावेळेस आपल्याला माहिती देऊ शकणार नाही. ह्या संस्थेचे प्रॉस्पेक्टस ही संस्था ाकाय काम करते? ह्याची संपूर्ण अद्ययावत माहिती आपल्याला वन विभागात मिळेल. नाही मिळाली तर आपण मला संपर्क साधा. मी आपल्याला त्यांच्याकडून माहिती घेऊन देईन.

**गजानन भोईर :-**

साहेब, माहिती मिळेल. पण ठाणे महानगरपालिकेकडून सर्टीफिकेट मिळाले असेल की, त्यांनी चांगले काम केले आहे का नाही?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

त्यांचे प्रमाणपत्र आहे. प्रमाणपत्र वाचून दाखवतो.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, आपण मला चुकीचा ठराव दिलेला आहे. ते दुरुस्त करुन त्याची कॉपी द्या.

**प्र. सचिव :-**

सभेनंतर लगेचच देतो.

**रिटा शाह :-**

सभेमध्ये द्या. ऑफिशिअली द्या.

(मा. उपायुक्त (मुख्यालय) श्री. अशोककुमार रणखांब सो. ह्यांनी ठाणे महानगरपालिकेच्या प्रमाणपत्राचे सभागृहात वाचन केले.)

**प्रकरण क्र. १४३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षांची गणना करणेबाबत प्रत्यक्ष ठेकेदाराची निविदा मंजुर करणे.

**ठराव क्र. १५६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वृक्षांची गणना करणेकरीता दि. १३/१/२००५ रोजी दै. मुंबई सकाळ व दै. सागर या वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्यानुसार खालील ठेकेदारांकडून मुदतीत निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | निविदा धारकाचे नांव | प्रति वृक्ष दर (रु.) |
|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिकेत वृक्षांची गणना करणेबाबत | मे. इनव्हायरोमेंट ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी फाऊंडेशन | ७.२० |
| २ | | मे. माधव कन्सलटन्सी | ७.८० |
| ३ | | मे. कृषिधन | ८.०० |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ ते ३ मध्ये मे. इनव्हायरोमेंट ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी फाऊंडेशन यांचे दर सर्वात कमी आहेत व मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिलेल्या अटी मान्य आहेत.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेने वृक्षांची गणना करणेकरीता मे. इनव्हायरोमेंट ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी फाउंडेशन याची प्रति वृक्ष दर ७.२० रुपयेची निविदा स्विकारण्यास व येणा-या खर्चास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. रिटा शाह.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मला चुकीचा ठराव दिलेला आहे. त्याची दुरुस्ती कॉपी मला द्या. ही माझी तीसरी-चौथी सभा आहे. मी त्या ठरावाची कॉपी मागते.

**प्र. सचिव :-**

पाच मिनिटामध्ये देण्यांत येईल.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४४ चे वाचन केले.)

**केशव घरत :-**

सदर विषयाचा गोषवारा नाही का?

**मा. सभापती :-**

स्वतंत्र परवाना विभाग सुरु करण्यासाठी मागच्या वेळी बजेटमध्ये आपण तरतुद केली होती आणि ह्या वेळेला दोन कोटी रुपये या विभागाकरिता ठेवलेले आहेत. आपल्याला जे परवाने द्यायचे आहेत. मागच्या वेळेलाही परवान्याविषयी आपण चर्चा केली होती. परंतु, त्याचे तसे निश्चित स्वरुप नव्हते आणि जर इम्प्लिमेंन्टेशन करण्याबाबत आपण असा रेव्हेन्यु घ्यायचा असे आपण ठरवले. बजेटची सभा झाल्यानंतर आपण प्रत्येक दोन महिन्यांनी येणारे आपले कर, किती प्रमाणात कर येतो व महसुल होतो आणि त्याच्यामध्ये अधिका-यांना काय अडचणी निर्माण होतात? त्या अडचणींवर मात करता आली पाहिजे आणि त्यांना सरळ मार्गी ताबडतोब आपला महसुल वसुल होत गेला पाहिजे. अशा पद्धतीने आपण रेव्हेन्यु घेण्याचे ठरवले आणि स्वतंत्र विभाग करण्याचे आपण जे योजिले त्याकरिता दोन कोटी रुपयांची तरतुद आपण ठेवलेली आहे आणि मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये जवळ जवळ मिरा रोड एवढा फास्ट वाढत आहे, भाईंदर पूर्व वाढत आहे आणि भाईंदर पश्चिमेलाही विकास होत आहे आणि अशा पद्धतीने विकास होत असतात त्या ठिकाणी अनेक परवान्यांची आवश्यकता लागते. ट्रेडिंगच्या बाबतीत, किराणा माल असू दे, हॉटेल्स असू दे, बिअरबार असू दे किंवा ट्रेडींगचे अन्य काही सर्व प्रकारच्या जसे हॉस्पीटल्स आहेत, डॉक्टर्स आहेत, सलुनची दुकाने आहेत अशा अनेक प्रकारची दुकाने आपल्या मिरा भाईंदरमध्ये फार मोठ्या प्रमाणात उघडतात आणि त्याला परवाना देण्याच्या दृष्टीकोनातून आपण विचार केला होता की, हे परवाने एक विशिष्ट डिपार्टमेंट सुरु करुन त्या विभागामार्फत ते सुरु करावे व त्याची रक्कम आपण फिक्स केली तर आपल्याला हा रेव्हेन्यु मिळू शकेल. त्याच्यानंतर दुसरा भाग असा आहे की, भाईंदर पूर्व पट्टीमध्ये विशेषतः इंडस्ट्रीमध्ये असे अनेक गाळे उंच करण्यांत आलेले आहेत. किमान चौदा फुट त्याची उंची आपण करु शकतो. पण काही गाळे चौदा फुटापेक्षा जास्त आहेत आणि तसे काहीकांना परवानगी दिलेली आहे आणि त्यांनी केलेले आहेत आणि ज्यांना आपण परवानगी दिली नाही आणि त्यांनीही केलेले आहेत. अशा पद्धतीने जेवढ्या परवानग्या द्यायच्या असतील त्या परवानग्यांमध्ये हा भाग मोडतोय म्हणून ही परवानगी आपण ए.टी.पी.च्या माध्यमातून नगररचनेच्या माध्यमातून जसे नळाचे कनेकशन कोण देते, पाणी डिपार्टमेंट देते. परंतु नळ कनेक्शन ते देत असतांना आपण त्याला ए.टी.पी. चा रिमार्क घेतो, कर विभागाचा रिमार्क घेतो आणि नंतर त्या पाण्याची फाईल पुर्ण करुन आपण त्याचे इम्प्लिमेंन्टेशन करतो आणि त्याला आपण परवाना देतो. तशा पद्धतीने आपण परवाना डिपार्टमेंट नविन ओपन केले तर दोन कोटींचे उद्दिष्ट आपण ठेवले आहे. अंदाजपत्रकाच्या सभेमध्येही मी आपणांला बोललो होतो की, माझा दावा आहे आपण दोन कोटींची सीमारेषा पार करु शकेल. परंतु, जर ह्या पद्धतीने आपण हे जे विभाग ओपन केले आणि त्यांना विशिष्ट परवानग्या दिल्या आणि त्यांना अधिकार दिले आणि ते अधिकार दिल्यानंतर त्या पद्धतीचा रेव्हेन्यु आपल्याला मिळू शकेल. म्हणून या ठिकाणी ए.टी.पी.चे अधिकारी

शेंडे साहेब आहेत त्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला अशा पद्धतीने जे गाळे वाढविले ह्याच्यामध्ये काही टेक्निकली अडचणी आहेत. कारण. एम.आर.टी.पी.चा जो ॲक्ट ओ, बांधकामाचा जो ॲक्ट आहे त्या ॲक्टमध्ये काही प्रोव्हिजन अशी आहे की, त्याला आपण मान्यता देऊ शकत नाही असेही आहे. संपुर्णपणे उल्हासनगरलासुद्धा अशा पद्धतीने सर्व सरकारी जागेमध्ये वसलेले उल्हासनगर हे अधिकृत करावे म्हणून १९९५ पुर्वीची जी अनधिकृत बांधकामे आहेत त्याचा ठराव उल्हासनगर महानगरपालिकेला आहे. आपण ठरावही करु शकत नाही. ठराव केल्याने अनधिकृत बांधकामाला आपण प्रोत्साहन देतो अशा पद्धतीचे चित्र समोर दिसते. परंतु, आता सध्याचे पालकमंत्री सन्मा. श्री. गणेश नाईक साहेब ह्यांनी त्यांच्या दालनामध्ये बोलावून सर्व ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिकेचे महापौर, स्थायी समितीचे अध्यक्ष आणि आयुक्त साहेब ह्यांना सर्वांना त्या ठिकाणी पाचारण केले होते. त्यांनी हा विषय आणला आणि त्यांनी सांगितले की, माझी मुख्यमंत्री साहेबांबरोबर चर्चा झालेली आहे की, ठाणे जिल्ह्यामध्ये ज्या पद्धतीचे अनधिकृत बांधकाम चालू आहे व ही मोहिम सुरु झाली आणि वेगाने सुरु आहे. त्याला कुठेतरी आळा बसला पाहिजे आणि ह्याच्यामार्फत आपल्याला जो रेव्हेन्यु शासनाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला मिळू शकत नाही अशा प्रकारची चर्चा त्यांची मुख्यमंत्री साहेबांबरोबर झाली होती आणि त्या चर्चेनतर त्यांनी ही सभा बोलावली आणि त्या सभेमध्ये त्यांनी असे मत मांडले की, अनधिकृत बांधकामाला अधिकृतरित्या केले पाहिजे. त्या पद्धतीने कार्यवाही झाली पाहिजे. त्या पद्धतीने रेव्हेन्यु गोळा झाला पाहिजे अशा प्रकारच्या चर्चेकरिता त्यांनी आपल्याला बोलावले होते, तो विषय वेगळा झाला. परंतु, ह्या भागामध्ये जे गाळे आहेत, इंडस्ट्रीयल गाळे अहेत, त्या इंडस्ट्रीयल गाळ्यांवर आपण किती रुपये घेतले पाहीजे? त्याच्या बाबतीत अंदाजपत्रकामध्ये चर्चा झाली अणि पंधरा हजार रुपये गाळ्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता आणि पाच हजार रुपये घरांना अशा प्रकारची अंदाजपत्रकामध्ये सुचना मांडल्या गेल्या. त्या पद्धतीने शेंडे साहेब मी आपल्याला या ठिकाणी सुचित करतो की, प्रमुख स्त्रोत जे आहे ते ह्या इंडस्ट्रीजच्या माध्यमातून मिळू शकेल. कारण इंडस्ट्रीमध्ये गाळे उंच करत असतांना त्यांना कोणत्या दिव्यातून जावे लागते हे सर्व या ठिकाणी असलेले सन्मा. सदस्य परिचित आहेत. त्याचा येथे उल्लेख व्हावा अशी माझी इच्छा नाही व कायद्याच्या तरतुदीचा आपण उल्लेख करु शकत नाही. म्हणून त्या दिव्यातून जातांना त्यांना जी काही कठीण परिस्थिती निर्माण होते, त्यांना आपण सुलभरित्या असे पंधरा हजार रुपये उंची वाढविण्याबद्दल परवाना दिला आणि ज्यांनी परवाना घेतला नाही आणि बांधकाम केलेले आहे त्यांना कायद्यामध्ये बसुन जर परवाना दिला तर हा रेव्हेन्यु आपल्याला संपुर्ण जे दोन कोटीचे उद्दीष्ट बाळगले आहे. ते ह्या इंडस्ट्रीमधून होऊ शकेल असा विश्वास मला या ठिकाणी आपल्याला द्यायचा आहे. म्हणून जर असा डिपार्टमेंन्ट आपण वेगळा ओपन केला तर आपल्याला हा एक चांगला रेव्हेन्यु मिळू शकेल आणि जी माहिती एका विषयावर मांडली की, बिअर बार, व्हिडीओ थिएटरला परवानगी देतो. ते कशा पद्धतीने दिलेल्या आहेत, काय आहे? त्याची सरळ माहिती आपल्याला त्या ठिकाणी मिळू शकते. म्हणून सदर विषयावर सदस्यांनी चर्चा करुन एक चांगले विभाग जर खोलले व त्या विभागाला चांगले अधिकारी नेमुन दिले आणि त्या अधिकाऱ्यांच्या हाताखाली दोन-चार क्लार्क नेमले तर हा विभाग सुरु होईल आणि आपल्याला चांगल्या पद्धतीने जो महसुल मिळाला पाहिजे तो महसुल आपल्याला या मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून मिळू शकतो.

**मिलन पाटील :-**

अध्यक्षांच्या परवानगीने बोलतोय. साहेब, आता जी तुम्ही सुचना मांडलेली आहे. परंतु माझी अशी सुचना आहे की, आपण हे ए.टी.पी.कडे द्यायचे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ए.टी.पी.कडे द्यायचे नाही. आपल्याला नविन विभाग सुरु करायचा आहे. ए.टी.पी.कडे द्यायचे नाही. त्यांच्याकडे खुप कामे आहेत. म्हणून मी गेल्यावर्षी हा विषय आपणां समोर ठेवला होता की, परवाना विभाग आपण वेगळा करु या.

**मिलन पाटील :-**

हा जो विभाग आहे हा वेगळा करणे योग्य आहे. परंतु, जसे इन्कम टॅक्सने कसे केलेले आहे, कमी टॅक्स आणि करधारक जास्त. म्हणजे त्याच्यामधून ते घेण्याकरिता आपण कमीत कमी टॅक्स लावला पाहिजे. आपण त्यांना अशी गाईडलाईन दिली पाहिजे की, पानपट्टीवाला आहे त्याच्यावर आपण सरसकट असा टॅक्स लावायचा नाही तर त्या पानपट्टीवाल्याला किती टॅक्स लावायचा? हॉटेलवाल्यांना, डॉक्टरांना, इंडस्ट्रीवाल्यांना किती टॅक्स लावायचा? हे आपण ठरवून दिले पाहिजे आणि कमीत कमी टॅक्स लावा, जास्तीत जास्त लोक टॅक्स भरतील आणि दरवर्षी फक्त परवाना रिन्यु

करण्यासाठी बंधन टाकले तर जास्तीत जास्त लोक येतील. ऑथोराईज, अनऑथोराईज हे आपण बघायचे नाही. एखाद्याचे समजा दुकान असले तर ए.टी.पी.वाले किंवा बांधकामवाले बोलतील, हे अनऑथोराईज आहे. ह्याला द्यायचे नाही. आपण त्याला द्यायचे नाही. पण तो सुविधा आपली वापरतो. अध्यक्ष साहेब, आपण जसा टॅक्स घेतो ना, त्याला अनधिकृत शिक्का मारतो. टॅक्स वसुल करतो. एखादी बिल्डींग जर असली, आपली सुविधा वापरतो म्हणून टॅक्स घेतो की नाही, तशी तो ही सुविधा वापरतो त्याच्या बाबतीत दुकान किंवा काही असले तर आपण अधिकृत आहे किंवा अनधिकृत आहे ते बघायचे नाही. तो आपल्याकडे धंदा करतो नाही, म्हणून त्याने आपल्याला टॅक्स द्यायला पाहिजे. त्याच्या बाबतीत हे बघायचे नाही की, हे अनधिकृत शॉप आहे किंवा अधिकृतमध्ये शॉप आहे आणि जसे कमीत कमी होईल तेवढे जास्तीत जास्त लोक ह्याच्यामध्ये कव्हर अप करायचे. कमीत कमी टॅक्स लावायचा. तर लोक प्रत्येक वर्षी परवाना रिन्यु करतील. पाचशे रुपये, हजार रुपये, दोन हजार रुपये जर कोणाला टॅक्स लावला तर लोक त्याच्यात येणार नाही आणि जास्त कोणी दखल घेणार नाही आणि आपल्याला ते शोधण्याकरिता म्हणून आपली जी यंत्रणा आहे ती फार खर्ची करायला लागेल. कमी पैशात बसवले तर लोक स्वतःहून येऊन लाईन लावतील की, आम्हांला परवाना द्या म्हणून त्याच्या बाबतीत तुम्ही विचार करा की, पानपट्टीवाल्यांना आपण किती टॅक्स लावला पाहिजे? हॉटेलवाल्यांना किती लावला पाहिजे? हे ठरवूनच तुम्ही परवानाधारकाला टॅक्स लावा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जेव्हा आपण एखादा विभाग सुरु करु. पहिल्यांदा आपल्याला विभाग सुरु करण्याची परवानगी द्यायची आहे. हा विभाग सुरु केला आणि एखादा अधिकारी आपण नेमला आणि त्याच्या अखत्यारीमध्ये दोन क्लार्क दिले व कोणते रेटस् कोणत्या पद्धतीने करायला पाहिजे. आपला ए ग्रेड अंदाजपत्रकामध्ये झाला की, पंधरा हजार रुपये गाळा उंचीसाठी द्यायचा आणि पाच हजार रुपये घराच्या दुरुस्ती परवानगीकरिता. कारण दुरुस्तीच्या परवानगीवर काही इमारती सुरु आहेत आणि जे झोपडे बोलतो त्या घरांचे बंगले निर्माण झालेले आहेत. जर आपण तशा पद्धतीने विचार केला तर आपल्याला हा जो रेव्हेन्यु मिळतो तो कुठे अनाठायी मिळेल असे मला वाटत नाही. आपल्याला योग्यच मिळेल आणि पंधरा हजार रुपये जे या ठिकाणी व्यावसायिक धंदे करतात आणि त्यांना आपण गाळे पक्के करण्यासाठी देतो. त्या ठिकाणीसुद्धा काही ठिकाणी गाळा उंच करत असताना त्या गाळ्याची चौदा फुटाऐवजी डबल आणि ट्रिपल ही होऊ शकते. म्हणून या दोन्ही विषयावर आपण अंदाजपत्रकामध्ये चर्चा केली होती आणि इतर जे विभाग आपण समाविष्ट करणार आहोत. एकूण परवाने सर्व प्रकारचे परवाने ह्याच्यामध्ये आपल्याला रेन्यूची फी जरी नसली तरी त्याची माहिती मिळाली पाहिजे म्हणून त्याचा रुल टाकतो. सद्य परिस्थिती काय आहे म्हणून टाकतो. त्याच्याकरिता संपूर्णपणे कोणत्या पद्धतीने काय काय रेट्‌र्स आपण नेमले पाहिजे अशा पद्धतीने बघून आपण ते काम करून घेऊ.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, समजा आपण गाळयासाठी पंधरा हजार रूपये फिक्स केले त्याला आपण राईटींगमध्ये देणार का, हा परवाना दिला, पंधरा हजार रुपयामध्ये असे.

**मा. सभापती :-**

ती त्याची फी असेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

तो परवाना मिळाला म्हणजे तो वर बांधू शकतो.

**मा. सभापती :-**

होय, बांधू शकतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजे त्याला आपण याची लेखी परवानगी देणार.

**मा. सभापती :-**

होय, लेखी परवानगी देणार.

**केशव घरत :-**

साहेब, नविन की फक्त दुरूस्ती?

**मा. सभापती :-**

दुरूस्तीकरिता. उंची वाढविणे वगैरे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याला आपण लेखी परवानगी देणार का दुरूस्तीसाठी परवानगी देणार आहात आणि त्याच्या उंचीची लिमिट किती?

**मा. सभापती :-**

जी उंची मान्य आहे तेवढीच.

**प्रेमनाथ पाटील :-**

जास्त उंची असली तर?

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मी सदर विषयामध्ये सुचना मांडते की, जे लोकल गाळे उंची व गावठण क्षेत्रामध्ये रेन्युव्हेशनच्या नावावर बंगले बांधतात त्याबद्दल मी बोलत नाही, पण शहरी विभागामध्ये आपण कुठलेही परवाने देणार ते दुकान असू दे, हॉस्पीटल असू दे किंवा एखाद्या सोसायटीमध्ये चालणारा छोटासा कारखाना असू दे, त्याला परवाना देण्याअगोदर स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पाहिजे. कारण त्याच्यामध्ये किती सोसायटीचा वाद असतो. एखाद्या वेळेस तुम्ही परवाना देणार व नंतर लोकांचे ऑब्जेक्शन येणार. मी दुकानाबद्दल बोलत नाही पण सोसायटीमध्ये चालणा-या कारखान्याला तुम्ही परवाने देत असाल म्हणून तुम्ही त्या स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपल्याकडे जे परवाने घ्यायला येतील त्यांना तुम्ही स्थानिक नगरसेवकाचे पत्र घेऊन यायला सांगा. असेच आहे ना, मॅडम.

**मा. सभापती :-**

आपण जे बोलता, ते कायद्यामध्ये अंतर्भूत अशी बाब नाही. विषय असा आहे की, मागे आपण ठरवले होते की, जर एखादी टपरी म्हणजे एखादा अपंग असेल आणि त्याच्यासाठी रस्त्यावर सार्वजनिक मालमत्तेवर परवानगी द्यायची असेल त्यासाठी आपण तेथील स्थानिक नगरसेवकांचा पत्र पाहिजे असे केले होते. पण आपण जे बोलतो, ते माझ्या माहितीप्रमाणे कायद्यामध्ये अंतर्भूत होत नाही. परंतु, जर कायदेशीर बाबी जरी नसली तरी आपण ओरली त्यांना निर्देश देऊ शकतो. पण कायदेशीर बाब असे नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, गाळ्याकरिता अटीशर्ती काय राहतील?

**मा. सभापती :-**

ते आपण ठरवू त्याला मंजूरी द्यायला तो विषय सभेसमोर आणू.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, गाळ्याची जास्तीत जास्त उंची किती द्यावी?

**प्रेमनाथ पाटील :-**

माझ्या मते अठरा फुट आहे.

**गजानन भोईर :-**

गाळ्याची उंची चौदा फुट एवढी फिक्स करू.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. १४४, स्वतंत्र परवाना विभाग सुरू करणेबाबत याबाबत अंदाजपत्रकाच्या वेळी चर्चा करण्यात आली होती. सभापती साहेबांना मी सर्वप्रथम धन्यवाद देतो की, आपण लगेचच हा विषय विषयपटलावर घेतला. शहराच्या दृष्टीने आणि पालिकेच्या दृष्टीने महसुलामध्ये अत्यंत प्रभावी वाढ करणारे हे खाते आहे आणि त्याची दखल आपण घेतली. संपुर्ण सभागृहाच्या वतीने मी आपणांला धन्यवाद देतो आणि प्रकरण क्र. १४४, स्वतंत्र परवाना विभाग सुरु करणेबाबत. त्याच्यात दोन्ही गोष्टी आपण अंतर्भूत केलेले आहे, घर दुरुस्ती आणि गाळे दुरुस्ती आणि इतर जे काही विषय आहेत ते त्याच्यात अंतर्भूत करावयाचे आहेत. तरी हे सर्व विषय अंतर्भूत करुन आजची ही सभा स्वतंत्र परवाना विभाग सुरु करण्यासाठी मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडतो आणि हा स्वतंत्र विभाग सुरु करण्याच्या वतीने हा स्वतंत्र परवाना विभाग चालविण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या उपायुक्त साहेबांकडे सोपवावे अशी आजची स्थायी समितीची सभा ठराव देत आहे असा मी ठराव मांडतो.

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १४४ :-**

स्वतंत्र परवाना विभाग सुरु करणेबाबत.

**ठराव क्र. १५७ :-**

सन २००४-२००५ चे सुधारित व सन २००५-२००६ चे मुळ अंदाजपत्रक मंजुरीच्या वेळी परवाना या खात्यावर फार मोठ्या प्रमाणात जमा दाखवलेली आहे. त्या बाबींचा विचार करता महानगरपालिका हद्दीतील दुकाने, उद्योगधंदे, हॉटेल व्यवसाय, गाळे / घरे दुरुस्ती व इतर सर्व प्रकारच्या देय परवानग्यांसाठी स्वतंत्र परवाना विभाग मा. उपायुक्त सो. ह्यांच्या नियंत्रणाखाली सुरु करावा यासाठी ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४५ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १४५ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (पशुसंवर्धन विभाग)

**ठराव क्र. १५८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत २००३ मध्ये १७ वी पशुगणना आली. त्यानुसार शहरात एकुण ४,१८० भटकी कुत्र्यांची संख्या आहे. मोकाट कुत्र्यांच्या त्रासाबद्दल अनेक तक्रारी मा. नगरसेवक स्थानिक लोकांकडून प्राप्त झाल्या आहेत. प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६० व प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ या कायद्याचे पालन करुन मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणेची जबाबदारी महानगरपालिकेची आहे.

मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शिरे गावठाण, उत्तन येथील जुन्या कोंडवाड्याची दुरुस्ती करुन कुत्र्यांवर प्रजनन, शस्त्रक्रिया करणेसाठी बांधकाम करण्यांत आलेले आहे.

प्रथम वर्षी मोकाट कुत्र्यांच्या संख्येच्या २५ कुत्र्यांवर प्रजनन शस्त्रक्रीया करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यांत आली आहे.

सदर कामी महानगरपालिकेने दि. २८/१०/२००४ रोजी दै. सागर, व दै. लोकमत व वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर फेरनिविदा सुचननेनुसार शहरातील १) मोकाट कुत्रे पकडणे (डॉग व्हॅन व प्रशिक्षित कर्मचारी स्वतःचे) २) पकडून सदरचे कुत्रे शस्त्रक्रिये ठिकाणी नेणे ३) प्रजनन शस्त्रक्रिया करणे व श्वानदंश लस देणे ४) शस्त्रक्रिया केलेल्या कुत्र्यांवर आठ दिवस औषधोपचार व खानपान व्यवस्था करणे ५) प्रजनन शस्त्रक्रिया झाल्यावर ज्या जागेवरुन पकडलेत त्या जागेवर नेऊ व सोडणे या कामाकरिता निविदा मागविल्या होत्या.

| अ. क्र. | तपशील | डॉ. जगदिश पाटील | मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी | मे. ॲनिमल वेल्फेअर सेंटर |
|---|---|---|---|---|
| १ | मोकाट कुत्रे पकडणे (डॉग व्हॅन व प्रशिक्षित कर्मचारी स्वतःचे असावेत) | प्रती कुत्रा रु. ९७०/- | प्रती कुत्रा रु. ९५०/- | प्रती कुत्रा रु. १०५०/- |
| २ | पकडून सदरचे कुत्रे शस्त्रक्रिये ठिकाणी नेणे | | | |
| ३ | प्रजनन शस्त्रक्रिया करणे व श्वानदंश लस देण | | | |
| ४ | शस्त्रक्रिया केलेल्या कुत्र्यांवर ८ दिवस औषधोपचार व खानपान व्यवस्था करणे | | | |
| ५ | प्रजनन शस्त्रक्रिया झाल्यावर ज्या जागेवरुन मोकाट कुंत्रे पकडली त्याच जागेवर नेऊन सोडणे | | | |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी यांचे निवेदेतील दर सर्वात कमी व वाजवी आहेत. तरी सर्वांत कमी दराची निविदा मंजुर करणेंस मा. आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

तरी सदरची निविदा स्विकारण्यास व त्याकामी येणारे देयक अदा करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम दि. १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार वरील प्रकरण मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४६ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १४६ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (अग्निशमन विभाग)

**ठराव क्र. १५९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अग्नीशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने सदरच्या विभागास लागणारे साहित्य खरेदी करण्यांस मा. आयुक्त यांच्या मान्यतेने दि. ३०/१२/०४ रोजी 'दै. लोकमत' व 'दै. सुरज प्रकाश' या वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिद्ध करण्यांत आल्या होत्या. त्यात १) ए.सी. हॉ. स्टोक २) लाईफ बॉय ३) फुल बॉडी हारनेस ४) ट्रॉयफोड कॅरोल वीच सहीत ५) हॅन्डलसहित फॉल अरेस्टर ६) कॉम्प्रेसर एअर ब्रिदींग एपरेटस.

यासाठी अ.क्र. १ ते ५ साठी मे. युनिकेअर एमरजन्सी एक्युपमेंट प्रा. लि. अ.क्र. ६ साठी मे. जोसफ लेस्लीव्ह ड्रॅगर मॅनीफॅक्चरींग प्रा.लि. यांचे दर सर्वात कमी व वाजवी होते व त्या निविदा स्विकारण्यात आल्या आहेत.

वरील सर्व साहित्यासाठी अबकारी कर, जकात कर, विक्री कर मिळून वरील साहित्य खरेदी करण्यासाठी १० लाखाच्या आत खर्च येणार आहे. त्यासाठी मा. आयुक्तांनी त्यास मंजुरी दिलेली आहे.

सबब उपरोक्त प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७३(ड) नुसार स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४७ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १४७ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (वाहन विभाग)

**ठराव क्र. १६० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. ३१/३/९७ रोजी जे.सी.बी. मशिन खरेदी करण्यात आलेला आहे. सदरचा जे.सी.बी. सन २००० पर्यंत आरोग्य विभागात कार्यरत होता. परंतु जे.सी.बी. वर मोठ्या प्रमाणावर खर्च येत असल्याने जे.सी.बी. बंद अवस्थेत होता. परंतु आरोग्य विभागाची कामाची निकड, आवश्यकता व परिणामकारक काम करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाकडून दुरुस्ती बाबत सतत विचारणा होत होती म्हणून जे.सी.बी. उत्पादक कंपनी मे. एल. ॲन्ड टी. लि. यांचेकडून जे.सी.बी. दुरुस्तीचे दरपत्रक मागवून घेतले. कंपनीने सादर केलेले दरपत्रक रु. ५,२१,८१०/- परंतु प्रत्यक्ष जे.सी.बी. दुरुस्तीसाठी रु. ५,९८,८४२/- इतका खर्च झलोला आहे. त्यानुसार मा. आयुक्त सोा.

यांचे अधिकारात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ड नुसार उत्पादक कंपनीने सादर केलेल्या देयकांस देयक अदा करणेंस मा. स्थायी समिती अवलोकन करुन मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

विषयपत्रिकेवरील विषय संपलेले आहेत. पण सभा संपण्यापुर्वी सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांना दुरुस्तीसह ठरावाची कॉपी देण्यांत यावी.

**प्र. सचिव :-**

दुरुस्तीसह ठरावाची कॉपी देण्यांत आली आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मला जो सुधारित ठराव दिलेला आहे. पण मला असे वाटते आपण जर ॲक्च्युअली दुरुस्ती केली असेल तर सर्वांना कॉपी द्यायला पाहिजे. फक्त मला एकटीला देऊन काय उपयोग? सर्वांना ऑफिशिअली द्यायला पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

०८/११/२००४ च्या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. १५ ह्याच्यावर दुरुस्ती आहे. नागेश इरकर ह्यांचे जे वक्तव्य आहे. त्याच्यामध्ये त्यांचे दुसरे जे स्टेटमेंट आहे ते त्याच्यामधुन डिलीट करावे. ज्यांनी अगोदर ठाणे महानगरपालिका, नांदेड महानगरपालिकेची वृक्षगणना केलेली आहे असे जी वाक्यरचना आहे ते त्याच्यातून डिलीट करावे. परत त्यांचेच वाक्य त्यांनी एम.ए.सी.पी.ए. केले आहे ते डिलीट करावे आणि पान क्र. ३३ वर रमेश मनाळे ह्यांचे जे स्टेटमेंट आहे त्याच्यामध्ये मला वाटते राजपाठक साहेब ह्यांनी पुणे, मुंबई आणि कल्याणचे नियम आणि उपविधी बनवून दिलेले आहे हे जे स्टेटमेंट आहे ते त्याच्यामधुन डिलीट करावे.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपण सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.५५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**